# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १०/०२/२०२६

## <u>मा. महासभा सुचना क्र. ०२</u>

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती** ------------------------------------------------------------
**नगरसेवक / नगरसेविका,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा बुधवार दि. १८/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर महोदया यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. महासभा दि. १८/०२/२०२६, सभा सुचना क्र. ०२**

**विषयपत्रिका**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | **प्रश्नोत्तरे - निरंक** |
| -- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ०३ | दि. ०३/०२/२०२६ रोजीच्या मा. विशेष महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका – |
| ०४ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २० मधील तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करणेबाबत. |
| ०५ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (१) मधील तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत. |
| ०६ | परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करणे. |
| ०७ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २९ (अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत सहा प्रभाग समित्यांची रचना करणेबाबत. |
| -- | सर्व नियुक्त्या – निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) – निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | सरकारी पत्रे - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - निरंक |
| ०८ | मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग सन २०२६-२७ व २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता महानगरपालिका प्राथमिक/माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांना विविध कल्याणकारी योजने अंतर्गत डी.बी.टी या योजनेद्वारे शालेय दप्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विदयार्थ्यांच्या बँक खात्यात (DBT) करणेकरीता बाजारभाव ऑनलाईन दर मागविणेबाबत. |
| ०९ | मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग सन २०२६-२७ व २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता (बालवाडी ते दहावी) मनपा शाळेतील मुला व मुली करीता शालेय गणवेश, पि. टी युनिफॉर्म, वह्या, वॉटर बॉटल खरेदी करणेकामी निविदा मागविणेबाबत. |
| १० | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाडेतत्त्वावर आधारीत मालमत्ता कर दरांचे फेरबदल करुन सुधारीत दर मंजूर करण्याबाबत. |
| ११ | मिरा भाईंदर शहरातील फेरीवाल्यांकडून वसुल करण्यात येणाऱ्या बाजार फी मध्ये फेरबदल करणेबाबत. |
| १२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सिमेंट क्राँक्रीट रस्ते तयार करणे कामाबाबत. |
| १३ | मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षणात सुरु असलेल्या विविध कामांबाबत. |
| १४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे घोडबंदर रस्त्यामधील फाऊंटन हॉटेल ते गायमुख पर्यंत रस्त्याबाबत. |
| १५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र पुरमुक्त शहर (Flood Free City) करणेबाबत. |
| १६ | मिरारोड (पुर्व) वॉर्ड क्र. ०९ येथील हजरत टिपु सुलतान चौक नाव बदलणेबाबत. |
| १७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे डोंगरी, तारोडी, चौक, पाली, उत्तन व मोर्वा या ०६ महसुली गावांसाठीच्या क्षेत्रासाठी "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" यांनी तयार केलेल्या मंजूर विकास योजनेमधील मौजे उत्तन येथील स.क्र. २४२पै., व इतर या जमीनीवरील आ.क्र.२० "कत्तलखाना" हे आरक्षण वगळणेच्या अनुषंगाने फेरबदल करणे. |

| | |
|---|---|
| १८ | मिरा भाईंदर महानगरपालिकेने महानगरपालिका क्षेत्रामध्ये अधिसुचित केलेली नागरी पुर्नरुत्थान आराखडे (URP) / Cluster योजना रद्द करणे. |
| १९ | शासनाने एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील (UDCPR) पुनर्विकास योजना (Re-development) व नागरी पुनरुत्थान योजना (Cluster) संबंधित विनियमामध्ये अनुक्रमे दि. ०५/१२/२०२५ व दि. १२/१२/२०२५ अन्वये फेदबदल प्रस्तावीत केले असून त्यावर महानगरपालिकेकडून सूचना / हरकती नोंदविणे. |
| २० | मिरा भाईंदर शहराची सन १९९७ अन्वये ची मंजूर विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतूदीनुसार कलम २६ (१) अन्वये प्रसिद्ध करुन ती कलम ३० अन्वये नियुक्त अधिकारी यांनी शासनास मंजुरीसाठी सादर केली असून, सदर शासनास सादर केलेली प्रारुप विकास योजना रद्द करणे तसेच मौजे डोंगरी, तारोडी, चौक, पाली, उत्तन व मोर्वा या ०६ महसुली गावांची प्रारुप विकास योजना कलम २६ (१) अन्वये दि.२४/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध केली असून, सदर विकास योजना रद्द करुन सदरच्या दोन्ही विकास योजना एकत्रितपणे नव्याने तयार करणे. |
| २१ | मिरा भाईंदर महानगरपालिका वर्धापन दिन दि. २८/०२/२०२६ पासून रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून दि. २८/०२/२०२६ ते दि. २७/०२/२०२७ कालावधीत विविध उपक्रम / समारंभ आयोजित करणेबाबत. |

(दिनेश कैलास कानगुडे)
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव कार्यालय**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- १० फेब्रुवारी, २०२६**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०२/२०२६

### // गोषवारा //

**प्रकरण क्र. ०४ :-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २० मधील तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०(२) अन्वये महानगरपालिकेने सार्वत्रिक निवडणूकीनंतर आपल्या पहिल्या सभेत पालिका सदस्यांपैकी [सोळा] व्यक्तींची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक केली पाहिजे.

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये एकूण ९५ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आलेले आहेत. महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१(अ) अन्वये, महानगरपालिका मान्यताप्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल व महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात स्थायी समितीमध्ये सदस्यांचे नामनिर्देशन करील अशी तरतुद आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून पक्ष/गट मिळून केलेल्या आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **भारतीय जनता पार्टी** | **मिरा भाईंदर विकास आघाडी (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस + शिवसेना)** | **अपक्ष** |
|---|---|---|
| ७८ | १६ | १ |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१(अ) अन्वये, तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात स्थायी समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे होत आहे.

| **अ.क्र.** | **पक्ष/गट/आघाडी** | **सरासरी** | **प्रस्तावीत सदस्य** |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ७८ ÷ ९५ x १६ = १३.१३ | १३ |
| २ | मिरा भाईंदर विकास आघाडी (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस + शिवसेना) | १६ ÷ ९५ x १६ = २.६९ | ३ |
| ३ | अपक्ष | ०१ ÷ ९५ x १६ = ०.०६ | ० |
| | एकुण | | १६ |

वरील प्रमाणे स्थायी समितीवर सोळा सदस्यांचे नामनिर्देशन करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १८ /०२/२०२६**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ०५ :-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (१) मधील तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक दि. १५ जानेवारी, २०२६ रोजी पार पडलेली असुन, दि. १६ जानेवारी, २०२६ रोजी निवडणूक निकाल जाहिर झालेला आहे. तसेच दि. १९ जानेवारी, २०२६ रोजी निर्वाचित पालिका सदस्यांची नावे व निवडणूक निकाल महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३०(१) अन्वये, महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून [महिला व बालकल्याण समितीसह] विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. तसेच कलम ३०(१-अ) अन्वये महिला व बालकल्याण समितीवरील सदस्यांपैकी किमान पंचाहत्तर टक्के सदस्य हे, महिला पालिका सदस्यांमधील असतील. माता व बालकांच्या विविध कल्याणकारी योजना शासकिय धोरणाप्रमाणे राबविणे तसेच यासंबंधी नविन योजना सादर करून शासकिय धोरणाप्रमाणे कार्यन्वित करणे हे या समितीचे कार्यक्षेत्र राहिल.

महानगरपालिका प्रारुप सभा कामकाज नियम ४ (ब) अंतर्गत महिला व बालकल्याण समिती सदस्य संख्या नऊ इतकी निश्चीत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) अन्वये महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशी तरतुद आहे. परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात विशेष समित्यांकरिता सदस्य संख्या नमुद नाही.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून पक्ष/गट/फ्रंट मिळून केलेल्या आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | मिरा भाईंदर विकास आघाडी (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस + शिवसेना) | अपक्ष |
|---|---|---|
| ७८ | १६ | १ |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१(अ) अन्वये, तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे होत आहे.

| अ.क्र. | पक्ष/गट/आघाडी | समिती सदस्य ९ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ७८ ÷ ९५ x ९ = ७.३८ | ७ |
| २ | मिरा भाईंदर विकास आघाडी (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस + शिवसेना) | १६ ÷ ९५ x ९ = १.५१ | २ |
| ३ | अपक्ष | ०१ ÷ ९५ x ९ = ०.०९ | ० |
| **एकुण** | | | **९** |

तरी महिला व बालकल्याण समितीची मुदत व सदस्य संख्या निश्चित करुन समितीची रचना करणेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०२/२०२६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.०६:-** **परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २० कलम ३४२ (२)(अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपलिकेने मा. महासभा दि. २०/०१/२००५, ठराव क्र. ५५ अन्वये, परिवहन उपक्रम स्थापन केलेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २ चे कलम २५(२) अन्वये परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे तरतूद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २५(२) अन्वये, महानगरपालिकेने परिवहन उपक्रम संपादन किंवा स्थापन केल्यानंतर आपल्या पहिल्या सभेत महानगरपालिकेच्या मते ज्यांना प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्यीक, वित्तीय किंवा कामगार विषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल व जे **पालिका सदस्य असतील** वा **नसतील** अशा व्यक्तीमधून परिवहन समितीचे सदस्य म्हणून **बारा** व्यक्तींची नेमणूक केली पाहिजे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महापालिका सदस्य असलेल्या व्यक्तीमधून अथवा महापालिका सदस्य नसलेल्या व्यक्तीमधून परिवहन समितीवर सदस्य नेमणूक करणेबाबत धोरण ठरविणे आवश्यक आहे. परिवहन समितीवर नेमणूक करावयाचे सदस्य पालिका सदस्यांमधून घ्यावयाचे असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१(अ) प्रमाणे कार्यवाही करावी लागेल. तसेच महापालिका सदस्य नसलेल्या व्यक्तीमधून घ्यावयाचे असल्यास त्याबाबतीत निकष ठरवून परिवहन समितीवर सदस्य मा.महासभेत निवडणूकीद्वारे घ्यावे लागतील. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**अ) पालिका सदस्य असलेल्या व्यक्तीमधुन नियुक्त करताना करावयाची कार्यपद्धती :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१(अ) अन्वये, प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणेसाठी मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा आघाडीचे किंवा गटाचे किंवा फ्रंटचे तौलानिक संख्याबळ विचारात घेऊन परिवहन समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे होत आहे.

| अ.क्र. | पक्ष/गट/आघाडी | सरासरी | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ७८ ÷ ९५ x १२ = ९.८५ | १० |
| २ | मिरा भाईंदर विकास आघाडी (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस + शिवसेना) | १६ ÷ ९५ x १२ = २.०२ | २ |
| ३ | अपक्ष | ०१ ÷ ९५ x १२ = ०.१२ | ० |
| | एकुण | | १२ |

**ब) पालिका सदस्य नसलेल्या व्यक्तीमधून नियुक्त करताना करावयाची कार्यपद्धती :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २५(२) नुसार परिवहन समितीवर नियुक्त करावयाचे सदस्य महानगरपालिका सदस्य नसलेल्या व्यक्तींमधुन घ्यावयाचे असल्यास महानगरपालिका सदस्यांद्वारे महासभेत गुप्त मतदान घेऊन निवडणुद्वारे नियुक्ती करावी लागेल. त्यानुसार परिवहन समितीवर नियुक्त करावयाचे सदस्यांकरीता अधिनिमयतील तरतुदीनुसार निकषाप्रमाणे अर्ज मागवुन महासभेत गुप्त मतदान घेऊन निवडणूक प्रक्रिया घेण्यात येईल.

तरी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २५(२) नुसार परिवहन समितीवर सदस्य नियुक्ती करणेसाठी मा. महासभेची मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. ~~विशेष~~ महासभा दि. १८/०२/२०२६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ०७ :-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २९(अ)अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत सहा प्रभाग समित्या स्थापन करणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २९-अ मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या हद्दीत प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण व्हावे व लोकप्रतिनिधीत्व करणारे पदाधिकारी व नगरसेवक यांच्या लोकाभिमुख ध्येय धोरणानुसार प्रभागांचा विकास व्हावा म्हणून महानगरपालिकेने उपरोक्त कायदेशीर तरतुदीनुसार प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २९-अ(१) अन्वये ४.५ लाखांपेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंत लोकसंख्येसाठी प्रभाग समित्यांची किमान संख्या ४ व कमाल संख्या ९ इतकी करता येईल. सन २०११ च्या जनगणनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची एकुण लोकसंख्या ८,०९,३७८ इतकी आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २९-अ(१) मधील तरतुदीनुसार ४.५ लाख लोकसंख्येसाठी किमान ४ प्रभाग समित्या व ४.५ लाख लोकसंख्येवरील अतिरीक्त १,५०,००० लोकसंख्येला अतिरीक्त एक प्रभाग समिती याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका अतिरीक्त लोकसंख्या ३,५९,३७८ करीता २ प्रभाग समित्या (१,५०,००० X २ = ३,००,०००) अशा एकुण ६ प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर शहराचे पश्चिम रेल्वे उपनगरीय सेवेमुळे दोन भागात विभाजन झालेले आहे. तद्अनुषंगाने भौगोलिक क्षेत्र, नैसर्गिक हद्दी व मुख्य रस्ते यांचा विचार करुन भाईंदर (प.) भागात दोन प्रभाग समिती व भाईंदर (पू.) व मिरारोड भागात चार प्रभाग समित्यांची सन २०१७ मध्ये मा. महासभा ठराव क्र. ४, दि. १६/१०/२०१७ अन्वये खालीप्रमाणे रचना करण्यात आलेली होती.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणूक प्रभाग | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर पश्चिम, प्रभाग समिती क्र. १ | ८, २३, २४ | ०३ |
| २ | भाईंदर पश्चिम, प्रभाग समिती क्र. २ | १, ६, ७ | ०३ |
| ३ | भाईंदर पूर्व, प्रभाग समिती क्र. ३ | २, ३, ४, ५, ११ | ०५ |
| ४ | भाईंदर पूर्व, प्रभाग समिती क्र. ४ | ९, १०, १२, १३, १८ | ०५ |
| ५ | मिरारोड पूर्व, प्रभाग समिती क्र. ५ | २०, २१, २२ | ०३ |
| ६ | हायवे परिसर व मिरारोड पूर्व, प्रभाग समिती क्र. ६ | १४, १५, १६, १७, १९ | ०५ |
| **एकूण** | **६** | **२४** | **२४** |

सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेलया सार्वत्रिक निवडणुकीकरीता केलेली प्रभाग रचना २०१७ प्रमाणेच आहे. सन २०२५-२६ मधील निवडणूक प्रभागांची हद्द आणि क्षेत्र संलग्नता विचारात घेऊन सहा प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

सबब, प्रभाग समितींच्या रचनेस मान्यता देणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.) ता.जि.ठाणे**

**शिक्षण विभाग**

## मा. महासभा दि. १८/ ०२ /2026

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. ०८ :- मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग सन 2026-27 व 2027-28 या दोन शैक्षणिक वर्षाकरीता महानगरपालिका प्राथमिक/माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांना विविध कल्याणकारी योजने अंतर्गत डी.बी.टी. या योजनेव्दारे शालेय दप्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विदयार्थ्यांच्या बँक खात्यात (DBT) करणेकरीता बाजारभाव ऑनलाईन दर मागविणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण 36 प्राथमिक व माध्यमिक शाळा कार्यरत आहेत. सदर शाळेमध्ये अंदाजित 10 हजार विदयार्थी शिक्षण घेत आहेत. सन 2026-27 व सन 2027-28 या दोन शैक्षणिक वर्षाकरीता विविध कल्याणकारी योजने अंतर्गत DBT या योजनेव्दारे शालेय दफ्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विदयार्थ्यांच्या बँक खात्यात DBT व्दारे करण्यात येणार आहे. सन 2025-26 मध्ये कल्याणकारीत योजने अंतर्गत DBT या योजनेव्दारे शालेय दफ्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विदयार्थ्यांच्या बँक खात्यात DBT करणेकामी रु.1,05,45,461/- इतकी रक्कम अदा करणेकामी मा. प्रशासकीय ठराव क्रं.176 दि.29/07/2025 अन्वये मंजुर प्राप्त् करुन रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

सन 2026-27 व सन 2027-28 या दोन शैक्षणिक वर्षाकरीता विविध कल्याण योजने अंतर्गत DBT या योजनेव्दारे शलेय दफ्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे

हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विदयार्थ्यांच्या बँक खात्यात DBT करणेकरीता खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | विषय | सन 2025-26 या आर्थिक वर्षात आलेला खर्च | सन 2026-27 मध्ये 10% वाढ पकडुन येणारा अंदाजित खर्च | सन 2027-28 मध्ये 10% वाढ पकडुन येणारा अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांकरीता दफ्तर, बुट, मोजे | रु.1,05,45,461/- | रु.1,16,00,007/- | रु.1,27,60,007/- |

वरील तक्यात नमुद प्रमाणे सन 2026-27 व सन 2027-28 या दोन शैक्षणिक वर्षाकरीता तरतुद करण्यात येणार आहे.

तरी सन 2026-27 व सन 2027-28 या दोन शैक्षणिक वर्षाकरीता शासन निर्णय क्रं.डीसीटी 2316/प्र.क्र.133/का 1417 दि.05/12/2016 रोजीच्या शासन निर्णया नुसार महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांना शालेय दफ्तर व बुट मोजे या वस्तुस्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विदयार्थ्यांच्या बँक खात्यात जमा DBT करणेकरीता शालेय दफ्तर, बुट, मोजे हया वस्तुचे दर निश्चित करणेसाठी ऑनलाईन दर मागविणेकरीता मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(कविता बोरकर)
उप-आयुक्त (शिक्षण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मंजुरीने

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. १० / ०२ / २०२६ वेळ ३:०४:००
रजिस्टर नोंद अ. क्र. ०४ वर्ष २५-२६
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

E:\शिक्षण 2024\tharav ghoshwara\गोषवारा\विदयार्थ्यांना दफ्तर बुट मोजे DBT करणेबाबत गोषवारा.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प.) ता.जि.ठाणे

## शिक्षण विभाग

## मा. महासभा दि.१८/०२ /2026

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र.०९:- मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग सन 2026-27 व 2027-28 या दोन शैक्षणिक वर्षाकरीता (बालवाडी ते दहावी) मनपा शाळेतील मुला व मुलीकरीता शालेय गणवेश, पि.टी. युनिफॉर्म, वहया, वॉटर बॉटल, खरेदी करणेकामी निविदा मागविणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण 36 प्राथमिक व माध्यमिक शाळा कार्यरत आहेत. सदर शाळेमध्ये अंदाजित 10 हजार विदयार्थी शिक्षण घेत आहेत. सदर गरीब व गरजु विदयार्थ्यांना महानगरपालिकेकडुन दरवर्षी शालेय गणवेश पुरवठा केला जातो. त्याचप्रमाणे सन 2026-27 व सन 2027-28 या दोन शैक्षणिक वर्षाकरीता मनपा शालेय विदयार्थ्यांना शालेय गणवेश, पि.टी. युनिफॉर्म, वहया, वॉटर बॉटल यांचा पुरवठा करावयाचा आहे.

सन 2026-27 व सन 2027-28 या दोन शैक्षणिक वर्षाकरीता मनपा शाळेतील विदयार्थी यांना शालेय गणवेश, पि.टी. युनिफॉर्म, वहया, वॉटर बॉटल यांचा पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | इयत्ता | लेखाशिर्ष | सन 2025-26 मध्ये गणवेश, पि.टी.युनिफॉर्म, वहया, वॉटर बॉटल यावर झालेला खर्च (कार्यादेशानुसार) | सन 2026-27 करीता अंदाजे खर्च | सन 2027-28 करीता अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बालवाडी ते इयत्ता 10 अंदाजे पटसंख्या 10275 | विदयार्थ्यांना गणवेश/बॅच/टाय/पी.टी. युनिफॉर्म | रु.1,75,49,930/- | रु.2,66,71,270/- | रु.2,93,38,397/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | इयत्ता 1 ली ते 10 वी अंदाजे पटसंख्या 10275 | शालेय विदयार्थी वहया व इतर साहित्य् | रु.1,00,85,048/- | रु.1,11,11,955/- | रु.1,22,31,505/- |
| 3 | इयत्ता 1 ली ते 10 वी अंदाजे पटसंख्या 10275 | शालेय विदयार्थी करीता वॉटर बॉटल | रु.15,00,150/- | रु.19,52,250/- | रु.21,47,475/- |

सन 2026-27 व सन 2027-28 या दोन शैक्षणिक वर्षाकरीता बालवाडी ते इयत्ता 10 वी पर्यंतच्या मनपा शाळेतील विदयार्थ्यांकरीता शालेय गणवेश, बॅच, पि.टी. युनिफॉर्म, वहया, वॉटर बॉटल व इतर साहित्य खरेदी करण्याकरीता सन 2026-27 करीता 4 कोटी व सन 2027-28 करीता 4.50 कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सन 2026-27 या शैक्षणिक वर्षाकरीता तरतुद करण्यात येणार आहे.

तरी सन 2026-27 व सन 2027-28 या शैक्षणिक वर्षाकरीता बालवाडी ते इयत्ता 10 वी पर्यंतच्या विदयार्थ्यांकरीता शालेय गणवेश, बॅच, पि.टी., युनिफॉर्म, वहया व इतर साहित्य् खरेदी करणेकरीता ऑनलाईन निविदा मागविणेसाठी मान्यता मिळणेस शिफारस आहे.

**(कविता बोरकर)** **मा. आयुक्त सो. यांच्या मंजुरीने**

**उप-आयुक्त (शिक्षण)**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. महासभा / ... सभा
गोषवारा प्राप्त दि.10/02/26 ... 3:8:00
रजिस्टर नोंद अ. क्र. 06 ... 27.26
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

E:\शिक्षण 2024\tharav ghoshwara\गोषवारा\विदयार्थ्यांना गणवेश पी.टी युनिफॉर्म वॉटर बॉटल खरेदी करणेबाबत गोषवारा.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // मालमत्ता कर विभाग //

## मा. महासभा दि.१८/०२/२०२६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.७० :- मिरा-भाईंदर महानरपालिका क्षेत्रातील भाडेतत्वावर आधारीत मालमत्ता कर दरांचे फेरबदल करुन सुधारीत दर मंजूर करण्याबाबत.**

दि. ०४/०२/२०२६ रोजी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयांबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीत शहरातील भाडे करारनामानुसार व्यवसाय करणारे आस्थापना यांना भाडे करारनामानुसार कर आकारणीच्या कक्षेत आणून महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ करणे तसेच सदरची कर आकारणी करुन व्यावसायिक यांचेवर जास्त कराचा बोजा वाढु नये याकरीता यात सुवर्णमध्य साधणे बाबत चर्चा करण्यात आली व त्यानुसार फेररचना करणेकरीता प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सन २०१८ पूर्वी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाडेकरारनामा करुन व्यवसाय करणाऱ्या आस्थापनांना उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार करारनामातील मालमत्तेचे वार्षिक भाडे रक्कमेतुन १०% वजावट करुन उर्वरीत रक्कमेस मालमत्तेस करयोग्य मूल्य निश्चित करुन करयोग्य मूल्यावरुन विविध करांची टक्केवारी नुसार कर आकारणी करण्यात येते होती.

तथापि, सदर कर आकारणी धोरणामुळे भाडे करारनामाव्दारे व्यवसाय करणाऱ्या आस्थापनांना प्रत्यक्ष भाडे रक्कमेच्या ९०% रक्कमेवर कराची आकारणी होत असल्याने कर आकारणीत सवलत देणे तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध आस्थापने येऊन उद्योगास चालना मिळणे हेतु मा. महासभा ठराव क्र. ६२ दि. २०/०२/२०१८ अन्वये भाडे करारनामाव्दारे व्यवसाय करणारे अनिवासी आस्थापनांना मालमत्ता कराची आकारणी करताना करारनामातील वार्षिक भाडे रक्कम ऐवजी सदर वार्षिक भाडे रक्कमेच्या २०% रक्कम वार्षिक भाडे रक्कम अथवा रु. १०/- प्र.चौ. फु. यापैकी जे जादा असेल त्यादराने मालमत्ता कराची आकारणी करण्याबाबत ठराव पारीत करण्यात आला. व दि. ०१/०४/२०१८ पासून सदर ठरावाची अंमलबजावणी करुन मालमत्ता कराची आकारणी करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका लगत असलेल्या इतर महानगरपालिकांमध्ये भाडे करारनामा नुसार व्यवसाय करणारे आस्थापनांकरीता खालीलप्रमाणे कर आकारणी पद्धतीचा अवलंब करण्यात येते.

**<u>ठाणे महानगरपालिका :-</u>**

१. कराचा भरणा जागा मालक करीत असल्यास, वार्षिक भाडे रक्कमेचे २०% रक्कम वार्षिक भाडे रक्कम ग्राह्य धरुन त्यात १०% वजावट करुन उर्वरीत रक्कम ही त्या मालमत्तेची करयोग्य मूल्य निश्चित करणे.

२. कराचा भरणा भाडेकरु करीत असल्यास, वार्षिक भाडे रक्कमेचे ४०% रक्कम वार्षिक भाडे रक्कम ग्राह्य धरुन त्यात १०% वजावट करुन उर्वरीत रक्कम ही त्या मालमत्तेची करयोग्य मूल्य निश्चित करणे.

**<u>कल्याण-डोंबिवली महानगरपालिका :-</u>**

जुन्या भाडयाने दिलेल्या अनिवासी मिळकती तसेच नव्याने भाडयाने दिलेल्या अनिवासी मिळकतींची भाडेकरारनाम्यातील सर्व बाबी तपासून प्रकरणतत्वे दि. ०१/०४/२०२५ पासून अनिवासी दराच्या दुप्पट दराने कर आकारणी करणे.

**पनवेल महानगरपालिका :-**

मालमत्ता भाडे तत्वावर (लिव्ह अॅण्ड लायसन्स) दिली असल्यास मालमत्ता कराची आकारणी करतेवेळी वार्षिक भाडेमुल्याच्या दुप्पट दराने करणे.

वरीलप्रमाणे अवलोकन करता मिरा भाईंदर महानगरपालिका लगत असलेल्या इतर महानगरपालिकेच्या दरांशी तुलना केल्यास मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सद्याचा दर हा कमी आहे.

मा. सह. आयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे पत्र क्र. नपप्रसां/२०२२/ १५वावि/कक्ष-५/५९३१ दि. २७/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी उत्पन्न स्त्रोतामध्ये वाढ करणे बाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ करणे बाबत सुचविण्यात आले आहे. व १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी विविध अटी व शर्ती निर्धारीत केल्या आहेत. यामध्ये उत्पन्नात वाढ करणे ही प्रमुख शिफारस अणि अट निर्धारीत करण्यात आली असून याबाबत मा. शासन निर्णय क्र. एफएफसी-२०२२/प्र.क्र.१२६/नवि-०४ दि. ०२/०३/२०२३ अन्वये १५ व्या वित्तीय आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार कराच्या उत्पन्नात वाढ करणे बाबत निर्देश दिलेले असून दि.०८/०१/२०२६ रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील आढावा बैठकीत महानगरपालिकांचे शासन अनुदानावर अवलंबून राहण्याचे प्रमाण जास्त असल्याने मालमत्ता कर आकारणी, वसुली व इतर करेत्तर वसुली बाबींकडे लक्ष देणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

अशा परिस्थितीत दरकपात केल्यास महसूलात घट, वित्त आयोग अनुदानावर प्रतिकूल परिणाम, महसूल घट होऊन विकास कामांवर परिणाम, तसेच शासन अनुदान पात्रतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यमान कर दरांमध्ये कपात करणे महानगरपालिकेच्या आर्थिक हितास प्रतिकूल ठरेल.

सदर वस्तुस्थिती सविनय सादर करण्यात येत आहे.

**(प्रणाली घोंगे)**
**उपायुक्त (कर)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 12/02/2026 वेळ 5:03.10
रजिस्टर नोंद अ. क्र. 16 वर्ष 25-26
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका

## // बाजार विभाग //

## मा. महासभा दि. 18/02/2026

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.११ : मिरा भाईंदर शहरातील फेरीवाल्यांकडून वसुल करण्यात येणाऱ्या बाजार फी मध्ये फेरबदल करणेबाबत.**

सन 2023-24 या आर्थिक वर्षात बाजार फी वसुली करणेकामी ठेकेदार नियुक्त करताना बाजार फी वसुली मध्ये प्रति वर्षी 10% वाढ करणे ऐवजी प्रति वर्ष 20% वाढ करून वार्षिक ठेका न देता सलग तीन वर्षाकरीता ठेका देणे तसेच यापूर्वी असलेल्या प्रति फेरीवाला बाजार फी वसुली पावती शुल्कात रू. 25/- ने वाढ करून 2 चौ. मिटर पर्यंतच्या जागेकरीता करीता GST सह 89/- व 2 चौ.मि. पेक्षा जास्त जागेकरीता GST सह रू.118/- प्रमाणे दर दि.07-08-2023 रोजीच्या प्रशासकीय ठराव क्र.195 अन्वये निश्चित करण्यात आले. पूर्वीचे दर व वाढ करण्यात आलेले दर तसेच निर्धारीत रक्कमेत 20% वाढ करून होणाऱ्या रक्कमेचा तपशिल खालील प्रमाणे.

| | अ.क्र. | विभाग | सन | निर्धारीत रक्कम | 20% वाढ करून होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| अ | 1 | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र | 2023-24 | 7,48,70,483/- | 8,98,44,580/- |
| | 2 | | 2024-25 | 8,,98,44,580/- | 10,78,13,496/- |
| | 3 | | 2025-26 | 10,78,13,496/- | 12,93,76,195/- |

| ब | अ.क्र. | पावती दर जागेनुसार | पूर्वीची पावती फी रू. | GST (18%) | एकूण | वाढीव प्रमाणे पावती फी रू. | GST (18%) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 चौ.मि. पर्यंत | 50 | 9 | 59 | 75 | 14 | 89 |
| | 2 | 2 चौ.मि. पेक्षा जास्त | 75 | 14 | 89 | 100 | 18 | 118 |

वरील प्रमाणे दर निश्चित करून निविदा काढली असता ODS Protective Services Pvt. Ltd. यांनी eAuctio ऑनलाईन लावलेली अंतिम बोलीची रककम रू. 32,73,34,271/-(अक्षरी रूपये बत्तीस कोटी त्र्याहत्तर लाख चौत्तीस हजार दोनशे एकाहत्तर मात्र) + 18% GST ही बाजार विभागाने निर्धारीत केलेल्या रक्कमेपेक्षा जास्त असल्याने व महानगरपालिकेचे आर्थिक हित पाहता **ODS Protective Services Pvt.Ltd.** यांना दि.19-09-2024 रोजी प्रशासकीय ठराव क्र. 184 द्वारे मंजूरी देवून दि.03-10-2024 रोजी कार्यादेश देण्यात आला. सदर कार्यादेशानुसार ठेकेदार रू.90,92,619/- + 18% GST रू.16,36,671/- मिळून एकूण रू.1,07,29,290/- इतकी रक्कम प्रति महा महानगरपालिकेस भरणा करीत आहे.

दि.04-02-2026 रोजी मा. महापौर सो. यांचे अध्यक्षतेखाली व मा. आयुक्त सो. यांच्या उपस्थितीत सर्व विभाग प्रमुख यांच्या समवेत झालेल्या बैठकीत बाजार फी वसुली पावती शुल्कात रू.25/- ने केलेली वाढ लागू झाल्याने फेरीवाल्यांमध्ये तीव्र नाराजी तसेच फेरीवाल्यांना वाढीव बाजार फी रक्कम भरणे अडचणीचे होत असल्याच्या तक्रारी अनुषंगाने बाजार फी पावती दर कमी करणेबाबत चर्चा झाली.

महानगरपालिकेने 2 चौ. मिटर पर्यंतच्या जागेकरीता GST सह 89/- व 2 चौ.मि. पेक्षा जास्त जागेकरीता GST सह रू.118/- प्रमाणे बाजार फी वसुली करणेबाबत दि.03-10-2024 ते पुढे 3 वर्षांकरीता ठेका दिला असल्याने बाजार फी पावती दर कमी केलेल्या प्रमाणात बाजार फी वसुली ठेकेदाराकडून महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या रक्कमेत घट होईल. त्यामुळे बाजार फी पावती दर कमी केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम होवून आर्थिक हितास प्रतिकूल ठरेल.

सदर वस्तूस्थिती सविनय सादर करण्यात येत आहे.

**(प्रणाली घोंगे)**
**उपायुक्त (बाजार)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका.**

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. १२/02/२०२६ वेळ दु. ०३:१०
संचिका नोंद अ.क्र. १७ वर्ष २५-२६
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १८/ ०२ /2026

// गोषवारा //

**प्रकरण क्र. (१२ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे कामाबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र 79.40 चौ.किमीटर एवढे असून शहरात खालीलप्रमाणे रस्ते अस्तित्वात आहेत.

डांबरी रस्ते - 202 किमीटर

सिमेंट कॉंक्रीट रस्ते - 29 किमीटर

क्रॉंक्रीट पायवाटा - 5.50 किमीटर

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रस्त्याखालुन विविध सेवावाहिन्या पुरवठादार संस्था यांच्या वीजपुरवठा करणाऱ्या वाहिन्या, महानगरपालिकेच्या जलवाहिन्या, मलवाहिन्या, गॅस वाहिन्या, इंटरनेट पुरवठा करणाऱ्या वाहिन्या अंथरण्यात आलेल्या असून सदर रस्ते सेवा पुरवठादार संस्था तसेच महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी फॉल्ट काढणे, नविन वाहिन्या अंथरणे इ. कामाकरिता खोदण्यात येतात.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत डांबरी रस्ते मोठ्या स्वरुपात असून सदर रस्त्याचे आयुष्यमान पाहता व रस्त्यावरील होणारी खोदाई यामुळे रस्ते कमकुवत होऊन खड्डे पडतात तसेच पावसाळ्यात देखील सखल भागात पाणी साचुन खड्डे पडत आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर मनपा निधी, एमएमआरडीए कडील कर्ज इ. मधून करण्यात येत असून एमएमआरडीए मार्फत सद्यस्थितीत त्यांचे स्तरावरुन निविदा प्रक्रिया व निधी उपलब्ध करुन मोठ्या प्रमाणावर सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करण्यात येत आहेत.

सद्यस्थितीत एमएमआरडीए मार्फत 21.80 किमीटरचे रस्ते पुर्णत्वास आले असून नव्याने 14.20 किमीटरचे सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत मा. महासभा दि.02/09/2021 ठराव क्र.44 व मा. प्रशासकीय ठराव क्र.87 दि.27/10/2022 रोजीच्या मान्यता अन्वये कर्ज निधीतून सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करण्यासाठी दिलेल्या मान्यतेनुसार कर्ज निधीतून रु.500 कोटीची कामे मंजुर करण्यात आली आहेत. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक:- मिभाम-1122/प्र.क्र.72/नवि-28 दि.17 नोव्हेंबर 2022 अन्वये बँक ऑफ बडोदा यांचेकडून कर्ज घेण्यास मान्यता देण्यात आलेली असून बँक ऑफ बडोदाकडून कर्ज मंजूर करण्यात आले होते. त्यानुसार कामाची निविदा प्रक्रिया करुन कंत्राटदार यांना कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर मंजूर कामांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | वॉर्ड क्र. | रस्ता क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च | कामाची सद्यस्थिती | पुर्ण केलेल्या / सुरु कामावरील खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | *(Package-1)* | | | |
| 1 | 8 | P-9 | भाईंदर (प.) पोलीस स्टेशन ते सुभाषचंद्र बोस मैदान पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.11,93,25,953/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |

| अ. क्र. | वॉर्ड क्र. | रस्ता क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च | कामाची सद्यस्थिती | पुर्ण केलेल्या / सुरु कामावरील खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 8 | P-1 | भाईंदर (प.) मॅक्सेस चौकी कॉर्नर ते डी-मार्ट पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.3,97,49,826/- | **97% काम पुर्ण**<br>1. LHS / RHS - PQC - 200 मी. पर्यंतचे काम पुर्ण.<br>2. LHS / RHS - 200 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण. | रु.3,67,03,044/- |
| 3 | 8 | P-8 | भाईंदर (प.) जनार्दन रकवी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.8,94,60,239/- | **50% काम पुर्ण**<br>1. LHS / RHS - PQC - 310 मी. पर्यंतचे काम पुर्ण.<br>2. LHS / RHS - 200 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण. | रु.4,47,30,120/- |
| 4 | 6 | P-11 | भाईंदर (प.) अहिंसा चौक ते आकाश गंगा बिल्डींग पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.3,44,02,942/- | **80% काम पुर्ण.**<br>1. LHS / RHS - PQC - 200 मी. पर्यंतचे काम पुर्ण. | रु.2,86,69,118/- |
| 5 | 8 | P-2 | भाईंदर (प.) मॅक्सेस मॉल पोलिस चौकी ते नगरभवन पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे. | रु.11,02,51,703/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |
| 6 | 8 | P-3 | भाईंदर (प.) उड्डाणपुल समांतर रस्ता आय.डी.बी.आय बँक ते मॅक्सेस पोलीस चौकी पर्यंत कॉंक्रीटीकरण करणे. | रु.7,33,52,424/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |
| | | | ***(Package-2)*** | | | |
| 7 | 12 | P-26 | मिरारोड (पूर्व) ओस्तवाल ॲव्हेन्यु ते पार्क व्हयु हॉटेल पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.8,80,57,357/- | **100% काम पुर्ण**<br>1. LHS / RHS - PQC - 430 मी. पर्यंतचे काम पुर्ण.<br>2. LHS / RHS - 430 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण. | रु.8,80,57,357/- |
| 8 | 2 | P-13 | भाईंदर (पूर्व) जैसलपार्क पाण्याची टाकी ते जैसलपार्क चौपाटीकडे जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.3,94,49,967/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |

| अ. क्र. | वॉर्ड क्र. | रस्ता क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च | कामाची सद्यस्थिती | पुर्ण केलेल्या / सुरु कामावरील खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 10 | P-14 | भाईंदर (पूर्व) गोपीनाथ मुंडे क्रिडा संकुल ते गॅस गोडाऊनकडे जाणारा रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.5,21,69,410/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |
| 10 | 11 | P-22 | भाईंदर (पुर्व) ज्योती पार्क ते चाळघर पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.21,82,44,380/- | **10% काम पुर्ण.**<br>1. LHS - PQC - 95 मी. पर्यंतचे काम पुर्ण. | रु.2,18,24,438/- |
| | | | *(Package-3)* | | | |
| 11 | 19, 20 | P-42 | मिरारोड (पूर्व) एस.के. स्टोन ते मिरारोड स्टेशन पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.41,79,48,281/- | **20% काम पुर्ण.**<br>1. RHS - 390 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण.<br>2. LHS - 150 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण. | रु.8,35,89,656/- |
| | | | | | | |
| | | | *(Package-4)* | | | |
| 12 | 13, 18 | P-24 | मिरारोड (पूर्व) सिनेमॅक्स ते रामदेव पार्क पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.8,39,63,317/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |
| 13 | 12 | P-25 | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.231 ते दुर्गा रेसिडेन्सी पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.8,02,90,445/- | **20% काम पुर्ण.**<br>RHS - LHS 100 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण. | रु.1,60,58,089/- |
| 14 | 13 | P-63 | मिरारोड (पूर्व) साईस्नेहा ते वी पॉवर पर्यंत रस्ता सिमेंट काँक्रीट करणे | रु.7,80,91,716/- | **100% काम पुर्ण.**<br>1. RHS - 461 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण.<br>2. 461 मी. काँक्रीट रस्त्याचे काम पुर्ण. | रु.7,80,91,716/- |
| 15 | 13 | P-29 | मिरारोड (पूर्व) भवानी मेडिकल ते आरक्षण 261, सरदार पटेल शाळेपर्यंत/ टाऊन पार्क पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.16,50,11,985/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |

| अ. क्र. | वॉर्ड क्र. | रस्ता क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च | कामाची सद्यस्थिती | पुर्ण केलेल्या / सुरु कामावरील खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| 16 | 18 | P-30 | मिरारोड (पूर्व) कनकिया प्रथमेश हाईट्स ते ओस्तवाल ऑर्चिड रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.4,64,32,444/- | **100% काम पुर्ण.**<br>1. LHS / RHS - PQC 300 मी. पर्यंतचे काम पुर्ण.<br>2. LHS / RHS - 300 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण. | रू.5,10,00,000/- |
| 17 | 12 | P-35 | मिरारोड (पूर्व) आरक्षण नं.230 ते गोल्डन नेस्ट स्कुल पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.4,34,61,527/- | **60% काम पुर्ण.**<br>1. LHS / RHS - 200 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण. | रु.2,60,76,916/- |
| | | | | | | |
| | | | ***(Package-5)*** | | | |
| 18 | 13, 18 | P-31 | मिरारोड (पुर्व) कनकिया रस्ता ते सेंट थॉम शाळेपर्यंत काँक्रीटीकरण करणे | रु.50,96,36,859/- | **85% काम पुर्ण**<br>1. RHS - PQC 1530 मी. पर्यंतचे काम पुर्ण.<br>2. LHS - PQC 1490 मी. पर्यंतचे काम पुर्ण. | रु.43,31,91,330/- |
| | | | | | | |
| | | | ***(Package-6)*** | | | |
| 19 | 13, 18 | P-27 | मिरारोड (पूर्व) पंजाब फाऊंड्री ते विनय नगर पर्यंत व पुढे जे.पी. इन्फ्रापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.12,22,11,344/- | **70% काम पुर्ण**<br>1. RHS - PQC 280 मी. पर्यंतचे काम पुर्ण.<br>2. LHS - PQC 535 मी. पर्यंतचे काम पुर्ण. | रु.12,22,11,344/- |
| 20 | 13 | P-28 | मिरारोड (पूर्व) हटकेश ते घोडबंदर (रिसिव्हिंग स्टेशन) पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.13,82,82,348/- | 1. **45% काम पुर्ण**<br>2. RHS - PQC 667 मी. पर्यंतचे काम पुर्ण. | रु.13,82,82,348 /- |
| 21 | 22 | P-74 | मिरारोड (पूर्व) स्टेशन ते सिंगापूर प्लाझा पर्यंतचा रस्ता सिमेंट काँक्रीट करणे. | रु.15,11,38,766/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |
| 22 | 19 | P-52 | मिरारोड (पुर्व) शितलनगर येथे 1) सन्मान हॉटेल ते ममता स्वीट्स 2)एस.बी.आय. बॅक ते | रु.10,47,70,266/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |

| अ. क्र. | वॉर्ड क्र. | रस्ता क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च | कामाची सद्यस्थिती | पुर्ण केलेल्या / सुरु कामावरील खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | आलप सोसायटी 3) दादा शितलनाथ उद्यान ते शितल किरण सी विंग 4)एलिगंड फर्निचर ते गणेश मंदिर नाल्यापर्यंतचे रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | | | |
| | | | | | | |
| | | | *(Package-7)* | | | |
| 23 | 13, 18 | P-33 | मिरारोड (पूर्व) एस.के. स्टोन ते मेरी गोल्ड पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.48,05,73,286/- | **30% काम पुर्ण.**<br>1. LHS / RHS - SOLING - 130 मी.<br>GSB - 130 मी.<br>PCC - 130 मी.<br>काम पुर्ण.<br>2. LHS / RHS - 100 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण. | रु.3,42,59,413/- |
| 24 | 13 | P-67 | मिरारोड (पूर्व) गौरव व्हॅली जंक्शन ते वेस्टर्न हॉटेल पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | | **100% काम पुर्ण.**<br>1. LHS / RHS - PQC - 930 मी. पर्यंतचे काम पुर्ण.<br>2. LHS / RHS - 930 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण. | रु.24,21,41,621/- |
| 25 | 13, 18 | P-40 | मिरारोड (पूर्व) हटकेश उदयोग नगर मधील सालासर इमारत ते शांती विद्यानगरी पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | | **25% काम पुर्ण.**<br>1. LHS / RHS - SOLING - 190 मी.<br>GSB - 190 मी.<br>PCC - 190 मी.<br>काम पुर्ण.<br>2. 340 मी रोडचे काम पुर्ण | रु.4,72,92,272/- |
| | | | | | | |
| | | | *(Package-8)* | | | |
| 26 | 13 | P-39 | घोडबंदर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.31,05,84,789/- | **25% काम पुर्ण**<br>1. RHS - PQC - 440 मी. पर्यंतचे | रु.31,05,84,789/- |

| अ. क्र. | वॉर्ड क्र. | रस्ता क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च | कामाची सद्यस्थिती | पुर्ण केलेल्या / सुरु कामावरील खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | काम पुर्ण.<br>2. LHS - PQC - 300 मी. पर्यंतचे काम पुर्ण.<br>3. RHS - 390 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण.<br>4. LHS - 12 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण. | |
| | | | | | | |
| | | | ***(Package-9)*** | | | |
| 27 | 16 | P-97 | मिरारोड (पूर्व) नताशा पार्क चौक ते MIDC डेल्टा चौक पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.10,48,16,720/- | **30% काम पुर्ण**<br>1. LHS / RHS - PQC - 220 मी. पर्यंतचे काम पुर्ण. | रु.3,51,07,164 |
| 28 | 22 | P-43 | मिरारोड (पूर्व) हैदरी चौक ते रसाझ पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.10,04,90,711/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |
| 29 | 9 | P-34 | मिरारोड (पूर्व) पय्याडे हॉटेल ते आरक्षण क्र.170 पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.5,97,08,016/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |
| 30 | 21 | P-44 | मिरारोड स्टेशन ते जॉगर्स पार्क ते आरक्षण क्र.196 पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.17,34,94,122/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |
| 31 | 20 | P-102 | मिरारोड (पुर्व) देना बँक ते गणेश मंदिर पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे. | रु.5,34,77,423/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |
| | | | | | | |
| | | | ***(Package-10)*** | | | |
| 32 | 15, 17 | P-98 | मिरारोड (पुर्व) अहिल्याबाई होळकर चौक ते ओम शांती चौक पर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण | रु.5,70,38,368/- | **70% काम पुर्ण.**<br>1. LHS / RHS - PQC - 250 मी. पर्यंतचे काम पुर्ण. | रु.3,62,95,582/- |

| अ. क्र. | वॉर्ड क्र. | रस्ता क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च | कामाची सद्यस्थिती | पुर्ण केलेल्या / सुरु कामावरील खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | करणे. | | | |
| 33 | 15, 17 | P-47 | मिरारोड (पुर्व) संघवीनगर ते अंबर प्लाझा हॉल पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.8,77,23,900/- | **90% काम पुर्ण.**<br>1. LHS / RHS - PQC - 452 मी. पर्यंतचे काम पुर्ण.<br>2. LHS - 150 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण.<br>3. RHS - 452 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण. | रु.9,17,98,740/- |
| 34 | 19 | P-99 | मिरारोड (पूर्व) नयानगर अस्मिता ऑर्चिड ते एन.एच. स्कूल पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.4,47,33,128/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |
| 35 | 15 | P-48 | मिरारोड (पूर्व) प्लेझंट पार्क रोड मिरागाव ते राष्ट्रीय महामार्ग क्र.8 पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.26,80,80,834/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |
| 36 | 16 | P-49 | रा.म.क्र.08 दर्वेश ते खोडियार नगर स्मशानभूमी पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे. | रु.14,49,65,789/- | कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. | - |
| | | | | | | |
| | | | ***(Package-11)*** | | | |
| 37 | 12 | P-32 | मिरारोड (पुर्व) टाटा इंडिकॉम ते रामदेव पार्क व पुढे 30 मीटर कोस्टल रोडला जोडणारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.31,25,97,132/- | **50% काम पुर्ण**<br>1. LHS / RHS - PQC - 823 मी. पर्यंतचे काम पुर्ण.<br>2. RHS - 820 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण.<br>3. LHS - 85 मी. पर्यंतचे गटाराचे काम पुर्ण. | रु.15,62,98,566/- |
| | | | | **रु.5,00,39,87,717/-** | | **रु.212,22,63,623/-** |
| | | | | **500.39 कोटी** | | **212.32 कोटी** |

1. सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे कामासाठी एकुण अंदाजित खर्च रक्कम - रु.5,00,39,87,717/- (रु.500.39 कोटी)

2. सद्यस्थितीत पुर्ण झालेल्या / सुरु असलेल्या कामावरील देयके अदा करण्यासाठी लागणारी रक्कम - **रु.212,22,63,623/-** (रु.212.22 कोटी)
3. एकुण 37 कामांपैकी 21 कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सुरु असलेल्या सुमोटो जनहित याचिका क्र.71/2013 मधील निर्णयानुसार शहरातील रस्ते, पदपथ हे नागरीकांसाठी खड्डेमुक्त ठेवणे बंधनकारक असून सदर याचिकेतील दि.13/10/2025 रोजीच्या अंतिम सुनावणी आदेशानुसार खड्ड्यांमुळे अथवा मॅनहोलमुळे अपघात झाल्यास त्याचा कायदेशिर वारसास वैद्यकीय खर्च, भरपाई देणे बंधनकारक असून त्याबाबत निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

शहरातील रस्ते खड्डेमुक्त होण्यासाठी जास्तीत जास्त रस्ते हे सिमेंट काँक्रीटचे तयार करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत बँक ऑफ बडोदा यांनी मंजूर केलेले कर्ज देण्यास नकार दिल्याने इतर बँकेकडून कर्ज घेण्यासाठी प्रक्रिया करण्यात येत आहे.

सदर वस्तुस्थिती सविनय सादर करण्यात येत आहे.

(दिपक खांबित)
**प्र. शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.१० /02 /२०२६ वेळ ६:४:५० वा.
रजिस्टर नोंद अ.क्र. 06 दि. २४-२६
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.१८/०२/2026**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. ( १३ ) :- मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षणात सुरु असलेल्या विविध कामांबाबत..**

मिरा-भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेत सुरु असलेल्या विविध विकास कामांची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव / मंजुर निधी | शासन निर्णय | आरक्षणाचा तपशिल | कामाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| 1. | आरक्षण क्र.122 येथे हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे कलादालन<br>1. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र. १२२ या जागेत हिंदु हृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे कला दालन उभारणे. (टप्पा - १)<br>**सुधारीत मंजुर निधी** - रु.13,54,34,065/-<br>शासन निधी - रु.2,00,00,000/-<br>मनपा निधी - रु.11,54,34,065/-<br>मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र. १२२ या जागेत हिंदु हृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे कला दालन उभारणे. (टप्पा - २)<br>**मंजूर निधी** - रु.36,00,00,000/-<br>2. क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र.122 हिंदुहृदय सम्राट शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे कला दालन बांधणे .(टप्पा -3)<br>**मंजूर निधी** - रु.25,00,00,000/-<br>3.मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र.122 हिंदुहृदय सम्राट शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालन बांधणे.(टप्पा 4)<br>**मंजूर निधी** - रु.15,00,00,000/-<br>4. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालनाची कामे करणे. (मुलभुत सोई सुविधांचा विकास) (टप्पा -5)<br>**मंजूर निधी** - रु.50,00,00,000/-<br>**एकुण मंजुर निधी** रु.139,54,34,065/- | 1. क्र.मनपा-2020/प्र.क्र. 81/नवि-16 दि.21 सप्टेंबर 2020<br>2. शासन निर्णय क्र.मनपा/ 2023/प्र.क्र.585 दि.13/11/2023<br>3. शासन निर्णय संकिर्ण/2024/प्र.क्र.167/नवि-16 दि.19/06/2024 (ई-789386)<br>4. शुध्दीपत्रक संकिर्ण/2024/प्र.क्र.167/नवि-16 दि.03/10/2024<br>5. शासन निर्णय संकिर्ण/2024/प्र.क्र.221/नवि-16 दि.05/11/2024 (ई-815788) | 1) मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.122 खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण करीता आहे.<br>2) सुधारीत प्रारुप विकास योजनेत आर्ट गॅलरी आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>3) बांधकाम नकाशे मंजुर आहेत. | काम पुर्ण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2. | चेना येथील रस्ता व नदीवरील पुल बांधणे<br>**मंजूर निधी** - रु.26.00 कोटी | क्र.मनपा-2020/प्र.क्र. 81/नवि-16 दि.21 सप्टेंबर 2020 | मंजुर विकास योजनेत 18 मी. रुंदीचा रस्ता दर्शविण्यात आला आहे. | 1)सदर कामातंर्गत महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या जागेत रस्ता व गटराचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरित कामाची जाग ताब्यात घेऊन काम करण्यात येईल. |
| 3. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.14 काशिमिरा येथील महानगरपालिकेच्या उद्यानासाठी आरक्षण क्र.368 या जागेवर ऑलम्पिक साईज तरण तलाव व आवश्यक सुविधेची इमारत बांधणे.<br>(स्वातंत्रविर विनायक दामोदर सावरकर तरण तलाव नामकरण)<br>**मंजूर निधी** - रु.10,00,00,000/- | शासन निर्णय मनपा/2022/प्र.क्र.141/नवि-16 दि.17/06/2022<br>शुध्दीपत्रक मनपा/2022/प्र.क्र.141/नवि-16 दि.10/10/2022<br>शुध्दीपत्रक मनपा/2022/प्र.क्र.141/नवि-16 दि.23/02/2023<br>शुध्दीपत्रक मनपा/2022/प्र.क्र.141/नवि-16 दि.21/11/2023<br>शुध्दीपत्रक मनपा/2022/प्र.क्र.141/नवि-16 दि.14/12/2023 | 1)मंजुर विकास योजनेत उद्यान आरक्षण आहे. 15% क्षेत्रात तरण तलाव व आवश्यक वापराची इमारत नकाशे मंजुर आहेत.<br>2)सुधारीत प्रारुप विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे. | 1) तरण तलावाचे आर.सी.सी. काम पुर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. |
| 4. | मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.260 /169 (प्रारुप) या जागेवर तरण तलाव बांधणे.<br>(इंदिराबाई बाबुराव सरनाईक तरण तलाव नामकरण)<br>**मंजूर निधी** - रु.10,00,00,000/- | | 1)मंजुर विकास योजनेत प्राथमिक शाळा व खेळाच मैदान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2)UDCPR 4.27 (3) नुसार म्युनिसिपल पर्पज वापरासाठी परवानगी प्राप्त असून तरण तलाव नकाशे मंजुर आहेत.<br>3)सुधारीत प्रारुप विकास योजनेत म्युनिसिपल पर्पज आरक्षण दर्शविण्यात आले आहे. | 1)तरण तलावाचे प्लम कॉक्रीट, पुल प्लंबिंग, साईड वॉलचे काम पुर्ण झालेले असून फिल्टरेशन टँक, फिल्टर वर्क, External वॉटर प्रुफींग, टायलिंगचे काम बाकी आहे. सदरील कामे सुरु आहेत. |
| 5 | भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.110 / 95 (प्रारुप) या जागेवर तरण तलाव बांधणे.<br>(धर्मविर आनंद दिघे तरण तलाव नामकरण)<br>**मंजूर निधी** - रु.10,00,00,000/- | | 1)मंजुर विकास योजनेत प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2)UDCPR 4.27 (3) नुसार पार्किंग व स्विमिंग पूल वापरासाठी परवानगी प्राप्त असून तरण तलाव व पार्किंग नकाशे मंजुर आहेत.<br>3)सुधारीत प्रारूप विकास योजनेत स्विमिंग पुल व पार्कींग आरक्षण दर्शविण्यात आले आहे. | 1)सी टाईप वॉल, राफ्ट, External वॉटर प्रुफींगचे काम पुर्ण झालेले असून तरण तलावाचे प्लम कॉक्रीट, पुल प्लंबिंग, साईड वॉल, सिलिंगचे काम बाकी आहे. सदरील कामे सुरु आहेत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फांउटंन हॉटेल समोरील मेरी टाईम बोर्डाच्या जागेमध्ये प्रवासी जेट्टी जवळ चौपाटी विकसीत करण्यासाठी<br>**मंजूर निधी - रु.10,00,00,000/-** | | 1) मंजुर विकास योजनेत चौपाटी आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) आवश्यक सर्व मान्यता प्राप्त. | 1) इमारतीचे पायलिंगचे काम पुर्ण झालेले असून फाऊंडेशनचे काम सुरु आहे. सदरील काम कांदळवन क्षेत्रालगत असल्याने दक्षता घ्यावी लागत आहे. |
| 7. | वर्सोवा ब्रिज ते घोडबंदर गावाशेजारी खाडी किनारा विकसीत करण्यासाठी<br>**मंजूर निधी - रु.150,00,00,000/-** | | 1) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड कडून परवानगी प्राप्त.<br>2) CRZ-II परवानगी प्राप्त | 1) खाडी किनारा विकसीत करणे CRZ-II मधील कामास सुरुवात करण्यात आलेली आहे.<br>2) तसेच CRZ-I मधील कामांच्या मंजूरीसाठी प्रस्ताव CRZ-I विभागाकडे सादर केला आहे. |
| 8. | भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.219 मध्ये तरण तलाव व आवश्यक सुविधेची इमारत बांधणे.<br>(माधव सदाशिवराव गोळवलकर तरण तलाव नामकरण)<br>**मंजूर निधी - रु.10,00,00,000/-** | | 1) मंजुर विकास योजनेत माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान आरक्षण दर्शविण्यात आले होते. तथापी<br>2) UDCPR 4.27 (3) नुसार म्युनिसिपल पर्पज आरक्षण परवानगी असून तरण तलाव, जिमनॅस्टीक सेंटर व मल्टीपर्पज हॉलसाठी नकाशे मंजुर आहेत.<br>3) सुधारीत प्रारुप विकास योजनेत एज्युकेशन पर्पज आरक्षण दर्शविण्यात आले आहे. | 1) तरण तलावाच्या खोदकाम व आर तरण तलावाचे प्लम कॉंक्रीट, पुल प्लंबिंग, साईड वॉल, External वॉटर प्रुफींगचे काम पुर्ण झालेली असून उर्वरीत कामे सुरु आहेत. |
| 9. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.219 मध्ये जिमनॅस्टीक सेंटर बांधणे. व विविध 05 समाज भवन बांधणे<br>1. निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी बैठक सभागृह नामकरण<br>2. उत्तराखंड समाज भवन नामकरण<br>3. हिमाचल प्रदेश समाज भवन नामकरण<br>4. केरळ समाज भवन नामकरण<br>5. ओडीसा समाज भवन नामकरण<br>**मंजूर निधी - रु.9,50,00,000/-** | शासन निर्णय<br>मनपा-2022/प्र.क्र.174(19/1)/नवि-16 दि.22/07/2022<br>शुध्दीपत्रक मनपा-2022/प्र.क्र.174(19/1)/नवि-16 दि.23/02/2023<br>शुध्दीपत्रक मनपा-2022/प्र.क्र.174(19/1)/नवि-16 दि.08/02/2024<br>मनपा-2022/प्र.क्र.170(01)/नवि-16 दि.01/12/2022 | 1) मंजुर विकास योजनेत माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान आरक्षण दर्शविण्यात आले होते.<br>2) UDCPR 4.27 (3) नुसार म्युन्सीपल पर्पज आरक्षण परवानगी असून तरण तलाव, जिमनॅस्टीक सेंटर व मल्टीपर्पज हॉलसाठी नकाशे मंजुर आहेत. | सदर इमारतीचे Piles चे पुर्ण Foundation चे काम सुरु |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शुध्दीपत्रक मनपा-2022/प्र.क्र.170(01)/नवि-16 दि.08/02/2024<br>शासन निर्णय पत्रक मनपा-2023/प्र.क्र.87-ब-14/नवि-16 दि.25/04/2023<br>शुध्दीपत्रक मनपा-2023/प्र.क्र.87-ब-14/नवि-16 दि.07/02/2024 | 3) सुधारीत प्रारुप विकास योजनेत एज्युकेशन पर्पज आरक्षण दर्शविण्यात आले आहे. | |
| 10. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.246 येथे भारतरत्न स्व.लता दिनानाथ मंगेशकर संगीत विद्यालय (गुरुकूल) आवश्यक वापराची इमारत बांधणे.<br>**मंजूर निधी** - रु.25,00,00,000/- | शासन निर्णय क्र.मनपा/ 2022/प्र.क्र.142(03)नवि-16 दि.17/06/2022<br>शासन निर्णय क्र.मनपा/ 2022/प्र.क्र.142(03)भाग-1/अ/नवि-16 दि.13/04/2023 | 1) मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.246 खेळाचे मैदान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) 15% जागेत नकाशे मंजुर आहेत.<br>3) सदर आरक्षणाचा कलम 37 (1) नुसार फेरबदल प्रस्ताव क्र.टिपीएस-1224 / 529/ प्र.क्र.104(भाग-1)/ 24/ नवि-12 अन्वये शासन स्तरावर आहे. | 1)आर.सी.सी. कामे पुर्ण झालेली असून अंतर्गत कामे सुरु आहेत. |
| 11. | मिरा-भाईंदर क्षेत्रातील आरक्षण क्र.370 या उद्यान जागेवर आरक्षित 15% जागेवर आवश्यक वापराची इमारत बांधणे. (कै.सिंधुताई सपकाळ तिरंदाजी केंद्र नामकरण)<br>**मंजूर निधी** - रु.1,00,00,000/- | 1. शासन निर्णय मनपा/2022/प्र.क्र.66/(24/अ)/नवि-16 दि.30/03/2022<br>2. शुध्दीपत्रक मनपा/2022/प्र.क्र.66/(24/अ)/नवि-16 दि.23/02/2023<br>3.शुध्दीपत्रक मनपा/2022/प्र.क्र.66/(24/अ)/नवि-16 दि.07/02/2024 | 1) मंजुर विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) 15% जागेत नकाशे मंजुर आहेत.<br>3) सुधारीत प्रारुप विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे. | 1) Foundation चे काम पुर्ण उर्वरित काम सुरु |
| 12. | मिरा-भाईंदर क्षेत्रातील आरक्षण क्र.248 बगीचा या आरक्षित जागेत आवश्यक वापराची इमारत बांधणे (भाग-1) (सद्गुरु सदानंद महाराज वाचनालय नामकरण)<br>**मंजूर निधी** - रु.1,00,00,000/- | शासन निर्णय<br>मनपा-2022/प्र.क्र.174(19/1)/नवि-16 दि.22/07/2022<br>शुध्दीपत्रक मनपा-2022/प्र.क्र.174(19/1)/नवि-16 दि.23/02/2023<br>शुध्दीपत्रक मनपा-2022/प्र.क्र.174(19/1)/नवि-16 दि.08/02/2024 | 1) मंजुर विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) 15% जागेत नकाशे मंजुर आहेत.<br>3) सुधारीत प्रारुप विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे. | 1) प्लिंथचे काम पुर्ण झाले असून पहिल्या स्लॅबपर्यंतचा कॉलम चे काम पुर्ण.<br>2) स्लॅबच्या कामासाठी सेंटरींगचे काम सुरु.<br>3) ब्रीक वर्कचे, बाहेरील - आतील प्लॅस्टरचे व रंगकाम, प्लम्बींग व विद्युत विषयक काम तसेच साईट डेव्हलमेंटचे काम शिल्लक आहे. |
| 13. | मिरा-भाईंदर क्षेत्रातील आरक्षण क्र.248 बगीचा या आरक्षित जागेत आवश्यक वापराची इमारत बांधणे (भाग-2) (महाराजा अग्रेसन दिव्यांग भवन नामकरण)<br>**मंजूर निधी** - रु.1,00,00,000/- | | 1) मंजुर विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) 15% जागेत नकाशे मंजुर आहेत.<br>3) सुधारीत प्रारुप विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14. | मिरा-भाईंदर क्षेत्रातील आरक्षण क्र.254 बगीचा या आरक्षित असलेल्या जागेवर आवश्यक वापराची इमारत बांधणे (महाराणा प्रताप भवन नामकरण)<br>**मंजूर निधी -** रु.2,00,00,000/- | | 1) मंजुर विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) 15% जागेत नकाशे मंजुर आहेत.<br>3) सुधारीत प्रारुप विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे. | 1)आर.सी.सी.बांधकाम, ब्रिक वर्क, प्लॅस्टरचे, कम्पाऊंड वॉलचे बांधकाम काम पुर्ण झाले असून साईट डेव्हलपमेंट, विद्युत विषयक व प्लबिंग विषयक, waterproofing ची कामे सुरु.<br>2)फ्लोरिंग, बाहेरील व आतिल रंगकाम, दरवाजे खिडक्याच्या फ्रेमिंगचे काम शिल्लक आहे. |
| 15. | मिरा-भाईंदर क्षेत्रातील आरक्षण क्र.320 या जागेवर आवश्यक वापराची इमारत बांधणे (भाग-1) (मैथीली समाज भवन नामकरण)<br>**मंजूर निधी -** रु.1,00,00,000/- | | 1) मंजुर विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) 15% जागेत नकाशे मंजुर आहेत.<br>3) सुधारीत प्रारुप विकास योजनेत पाण्याची टाकी, पोलिस स्टेशन व फायर स्टेशन आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>4) सदर आरक्षणाचा कलम 37 (1) नुसार फेरबदल प्रस्ताव क्र.टिपीएस-1224/ 532/प्र.क्र.112/24/नवि-12 अन्वये शासन स्तवरावर आहे. | काम पुर्ण |
| 16. | मिरा-भाईंदर क्षेत्रातील आरक्षण क्र.320 या जागेवर आवश्यक वापराची इमारत बांधणे (भाग-2) (बंगाली समाज भवन नामकरण)<br>**मंजूर निधी -** रु.1,00,00,000/- | | 1) मंजुर विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) 15% जागेत नकाशे मंजुर आहेत.<br>3) सुधारीत प्रारुप विकास योजनेत पाण्याची टाकी, पोलिस स्टेशन व फायर स्टेशन आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>4) सदर आरक्षणाचा कलम 37 (1) नुसार फेरबदल प्रस्ताव क्र. टिपीएस-1224/ 532/प्र.क्र.112/24/नवि-12 अन्वये शासन स्तवरावर आहे. | काम पुर्ण |
| 17. | मिरा-भाईंदर क्षेत्रातील आरक्षण क्र.310 या जागेवर आवश्यक वापराची इमारत बांधणे (भाग-1) (दक्षिण भारतीय भवन नामकरण)<br>**मंजूर निधी -** रु.1,00,00,000/- | | 1) मंजुर विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) 15% जागेत नकाशे मंजुर आहेत. | काम पुर्ण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 3) सुधारीत प्रारुप विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे. | |
| 18. | मिरा-भाईंदर क्षेत्रातील आरक्षण क्र.310 या जागेवर आवश्यक वापराची इमारत बांधणे (भाग-2) (सरदार वल्लभभाई पटेल भवन नामकरण)<br>**मंजूर निधी -** रु.1,00,00,000/- | | 1) मंजुर विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) 15% जागेत नकाशे मंजुर आहेत.<br>3) सुधारीत प्रारुप विकास योजनेत उद्यान आरक्षण दर्शविण्यात आले आहे. | काम पुर्ण |
| 19. | मिरा-भाईंदर क्षेत्रातील अपना घरच्या सुविधा भुखंडावरती आवश्यक वापराची इमारत बांधणे.<br>(दि.बा.पाटील व्यायामशाळा नामकरण)<br>**मंजूर निधी -** रु.1,00,00,000/- | | 1) सदर जागा ॲमिनिटीओपन स्पेसची आहे.<br>2) नकाशे मंजुर आहेत. | 1) कामास सुरुवात नाही.<br>2) सदर कामाच्या जागेवर स्थानिक रहिवाश्यांचा विरोध आहे. |
| 20. | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दितील सर्व स्मशानभुमींचे अद्यावत विद्युत दाहिन्या बसवुन संपुर्ण सुशोभिकरण करणे.<br>**मंजूर निधी -** रु.50,00,00,000/- | शासन निर्णय मनपा/2022/प्र.क्र.170/(01)/नवि-16 दि.05/07/2022<br>मनपा/2022/प्र.क्र.170/(01)/नवि-16 दि.01/12/2022<br>शुध्दीपत्रक मनपा/2022/प्र.क्र.170/(01)/नवि-16 दि.08/02/2024 | 1) अस्तित्वातील नवघर, गोडदेव, काशिमिरा स्मशानभुमी नुतनीकरण कामे आहेत.<br>2) उत्तन येथे मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.91, सर्वधर्मिय स्मशानभुमी येथील काम आहेत. | 1) नवघर येथील पारंपारिक स्मशानभुमीचे लोकार्पण करण्यात आलेला आहे.<br>2) काशिमिरा येथील पारंपारिक स्मशानभुमीचे आर.सी.सी. काम पुर्ण झालेले असून उर्वरित फिनीशींगचे काम सुरु. कुंपणभिंतीचे काम, लाकडे ठेवण्याचे गोडाऊनचे इ.चे काम पुर्ण करण्यात आले असून स्मशानभुमी मध्ये गॅसीफायर शवदाहिनेचे आणि पारंपारिक शवदाहिनीचे कामे प्रगतीपथावर आहे.<br>3) गोडदेव स्मशानभुमीमध्ये बैठक व्यवस्था व गॅसीफायर शवदाहिनेचे काम प्रगतीपथावर आहे. |
| 21. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये असलेल्या सर्व उद्यानांमध्ये आर.जी.पी.जी. वर आधारित विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व सुलभ शौचालय तसेच इतर कामांसाठी<br>**मंजूर निधी -** रु.25,00,00,000/- | | 1) मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.119, 221, 216, 226, 235, 242, 248, 251, 261, 269, 273, 299, | 1)सदर कामातंर्गत 28 ठिकाणी अभ्यासिका, शौचालयाचे हिरकणी कक्षाची कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. त्यापैकी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 305, 314, 360 मधील 15% जागेत कामे आहेत. | 10 हिरकणी कक्ष काम पुर्ण 06 शौचालय काम पुर्ण व 09 अभ्यासिकांचे काम पुर्ण. उर्वरित कामे सुरु. |
| 22. | गुजरात मधील साबरमती रिव्हर वॉटर फ्रंट डेव्लपमेंटच्या धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दितील चेना नदीवर रिव्हर वॉटर फ्रंट डेव्हलपमेंट उभारण्यासाठी<br>**मंजूर निधी -** रु.200,00,00,000/- | | 1)मंजुर विकास योजनेत वॉटर फ्रट आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2)आवश्यक सर्व परवानग्या घेऊन काम करण्यात येत आहे. | 1)सदर कामांतर्गत रिटेनिंग वॉलसहीत कॅन्टी लिव्हर पाथवे, सुशोभिकरणाच्या कामाचा अंर्तभाव आहे.<br>2)सदर ठिकाणी 500.00 मी. आर.सी.सी. रिटेनिंग वॉलचे काम पुर्ण झाले असून कॅन्टी लेव्हर पाथवेचे काम सुरु.<br>3)पुढील रिटेनिंग वॉल बांधण्यासाठी 400.00 मी. खोदाईचे काम सुरु.<br>4)पादचारी पुलाचे डिमार्केशन पुर्ण करण्यात आलेले आहे. |
| 23. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ओवळा माजिवडा विधानसभा मतदारसंघामध्ये उद्यानाच्या आरक्षित भुखंडावर ट्रॅफिक पार्क उभारणे<br>**मंजूर निधी -** रु.5,00,00,000/- | | 1)मंजुर विकास योजनेत प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2)मंजुर विकास योजनेतील आरक्षण शाळा व मैदान मध्ये मोकळ्या जागेवर ट्रॉफिक पार्क उभारले आहे.<br>3)सुधारीत प्रारुप विकास योजनेत ओल्डऐज होम व फायर स्टेशन आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>4)सदर आरक्षणाच्या वापरात ट्रॅफिक पार्क बदल करणेस UDCPR 4.27 (3) अन्वये शासनाकडे प्रस्ताव सादर | काम पुर्ण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 24. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये फुटबॉल टर्फ उभारणे.<br>**मंजूर निधी -** रु.5,00,00,000/- | | मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.246, 122, 119 (मैदाने) व आरक्षण क्र.260 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) UDCPR 4.27 (3) नुसार म्युनिसिपल पर्पज बदलास मान्यता आहे. | 1. आरक्षण क्र.246 मैदान येथे फुटबॉल टर्फ तयार करण्याचे काम पुर्ण.<br>2. आरक्षण क्र.260 म्युनिसिपल पर्पज येथे फुटबॉल टर्फ तयार करण्याचे काम पुर्ण.<br>3. आरक्षण क्र.122 तेंडूलकर मैदान येथे फुटबॉल टर्फ तयार करण्याचे काम पुर्ण.<br>4) आरक्षण क्र.119 मैदानाच्या जागेत फुटबॉल टर्फ तयार करण्याचे काम पुर्ण. |
| 25 | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृह इमारतीचे वाढीव मजले बांधणे.<br>**मंजूर निधी -** रु.20.00 कोटी | | सामाजिक न्याय विभागाच्या जागेवर सदर विभागाच्या निधितुन व विशेष निधीतुन काम व नकाशे मंजुर आहेत. | 1) सदर इमारतीमध्ये अंतर्गत व बाहेरील प्लास्टरचे काम सुरू आहे. |
| 26 | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.14 मधील हिंदी माध्यमाचा शाळेसाठी<br>**मंजूर निधी -** रु.10.00 कोटी | 1) शासन निर्णय संकिर्ण/2024/प्र.क्र.167/नवि-16 दि.19/06/2024 (ई-789386)<br>2) शुध्दीपत्रक संकिर्ण/2024/प्र.क्र.167/नवि-16 दि.03/10/2024<br>3) शासन निर्णय संकिर्ण/2024/प्र.क्र.221/नवि-16 दि.05/11/2024 (ई-815788) | मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.365 शाळा व मैदान जागेवर काम आहे. | ज्योत्याचे काम सुरु आहे. |
| 27 | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.14 मधील डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम उद्यान विकसीत करणे.<br>**मंजूर निधी -** रु. 5.00 कोटी | | मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.364, उद्यान असून सदर जागेत काम आहे. | 1) आर.सी.सी. काम पुर्ण<br>2) ब्रीकवर्क, प्लास्टर, खिडक्या, रंगकाम, प्लंबिंग व इतर कामे प्रगतीपथावर आहेत. |
| 28 | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील स्व.प्रमोद महाजन कलादालनाचे उर्वरित काम करणे.<br>**मंजूर निधी -** रु. 25.00 कोटी | | 1) मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.300 मैदान आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) 15% जागेत नकाशे मंजुर आहेत.<br>3) सुधारीत प्रारुप विकास योजनेत आर्ट गॅलरी आरक्षण दर्शविण्यात आले आहे. | 1) विद्युत विषयक कामे, अंतर्गत सजावटीचे, वातानुकूलित यंत्रणे बसविणे, अंतर्गत फर्निचर, फॉलसिलींगचे काम, साईट डेव्हलपमेंट, लॅण्ड स्केपिंगचे काम शिल्लक आहेत. |
| 29 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या आरक्षित भुखंडावर मुख्यालयाच्या इमारतीसह इतर कामे करणे.<br>**मंजूर निधी -** रु. 20.00 कोटी | | 1) मंजुर विकास योजनेत म्युनिसिपल पर्पज आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) कुंपणभिंतीचे काम मंजुर आहे. | जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 30 | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये ज्येष्ठ साहित्यकार हरिवंशराय बच्चन भवन (नामकरण) उभारणे.<br>**मंजूर निधी -** रु. 25.00 कोटी | | 1) सदर जागा ही ॲमिनिटी ओपन स्पेसची आहे.<br>2) नकाशे मंजुर आहेत. | पायलिंगचे काम पुर्ण झालेले आहे. |
| 31 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घनकचरा प्रकल्पा अंतर्गत पेणकरपाडा येथील आरक्षण क्र.353 येथे घनकचरा प्रकल्प अंतर्गत कामे करणे.<br>**मंजूर निधी -** रु.12,83,03,700/- | 1) शासन निर्णय संकिर्ण/2024/प्र.क्र.167/नवि-16 दि.19/06/2024 (ई-789386)<br>2) शुध्दीपत्रक संकिर्ण/2024/प्र.क्र.167/नवि-16 दि.03/10/2024<br>3) शासन निर्णय संकिर्ण/2024/प्र.क्र.221/नवि-16 दि.05/11/2024 (ई-815788) | 1) मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.353 पब्लिक युटिलिटी आरक्षण दर्शविण्यात आले आहे.<br>2) शासन निधीतील काम आहे. | 1) सदर कामाचे ठेकेदारास कार्यादेश देण्यात असून प्रत्येक्ष जागेवर डिमार्केशन करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीमध्ये Compound Wall च्या कामास सुरुवात करण्यात आलेली असून 90.00 मी. लांबीचे गटाराचे व कंम्पाऊंड वॉलचे काम पुर्ण झालेले आहे. सद्यास्थितीमध्ये Raft चे काम पुर्ण झालेले आहे. |

सदर वस्तुस्थिती सविनय सादर करण्यात येत आहे.

**(दिपक खांबित)**
**प्र.शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

5-26/DK/GO-20

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/ ०२ /2026

// गोषवारा //

**प्रकरण क्र. ( १४ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे घोडबंदर रस्त्यामधील फाऊंटन हॉटेल ते गायमुख पर्यंत रस्त्याबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे - घोडबंदर या राज्यमार्ग क्र.84 (साखळी क्र.0/000 ते 4/400 किमी= 4.40 कि.मी) हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे, महाराष्ट्र शासन यांच्या ताब्यात होता. सदर रस्त्याची सरासरी रुंदी 22.00 मीटर एवढी आहे. मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेत सदर रस्ता 30 मीटर रुंदीचा दर्शविण्यात आलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ता व सेवा रस्ता संबंधित महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात यावा असे निर्देश मा. मुख्यमंत्री यांनी दि.22 एप्रिल 2023 रोजीच्या बैठकीत दिले असल्याबाबत पत्रात नमूद करुन मिरा भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरणासाठी अधिक्षक अभियंता, साबां मंडळ, ठाणे यांचेकडील दि.21/06/2024 रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला.

मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.9 जुलै 2024 रोजी विधानभवन येथे झालेल्या बैठकीत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शनपर्यंत घोडबंदर रस्त्याचे 60 मीटर करीता रुंदीकरणाबाबत चर्चा होऊन सदर प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल तयार करणेबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांनी एमएमआरडीए प्राधिकरणास सुचना दिल्याबाबत व त्या अनुषंगाने माहिती सादर करण्यास मुख्य अभियंता (अ.का), एमएमआरडीए यांनी दि.16/07/2024 रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेसे कळविण्यात आले.

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. प्रशासकीय ठराव क्र.100 दि.08/08/2024 रोजीच्या मान्यतेने फाऊंटन हॉटेल ते गायमुख हा 4.400 किमीटर लांबीचा रस्ता मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतर करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक.रवियो-2024/प्र.क्र.54/नियोजन-2 दि.3 जानेवारी 2025 अन्वये घोडबंदर राज्यमार्ग क्र.84 (सा.क्र.0/00 ते 4.400 किमी) = 4.400 किमीटर (फाऊंटन हॉटेल ते गायमुख पर्यंत) हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रस्ता दि.11/02/2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आला असून सदर रस्त्याची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सदर रस्त्यावरुन मेट्रो प्रकल्प व रस्त्याचे 60 मीटर रुंदीकरणाचे काम प्रस्तावित आहे. सदर रस्ता रुंदीकरणातील जागा ताब्यात घेणे, पर्यावरण, वन विभाग व इतर आवश्यक सर्व परवानग्या ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेस घ्यावयाच्या असून त्याबाबत आवश्यक प्रक्रिया सुरु आहेत.

वरील वस्तुस्थिती सविनय सादर करण्यात येत आहे.

**(दिपक खांबित)**
**प्र.शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

PC-09/2025-26/DK/MG-15

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.१० /02/२०२६ वे: ३.४.४०
रजिस्टर नोंद अ. क्र. ०९ वर्ष २५-२६
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.१८/०२/2026**

// गोषवारा //

**प्रकरण क्र. (९५) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र पुरमुक्त शहर (Flood Free City) करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या तीन बाजूस खाडी, समुद्र असून पुर्वेकडील बाजूस संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आहे. मिरा भाईंदर नगरपरिषदेची स्थापना दि.12 जून 1985 रोजी 09 ग्रामपंचायती मिळून झालेली असून तद्नंतर नगरपरिषद क्षेत्रात इतर गावांचा समावेश झालेला आहे. दि.28 फेब्रुवारी 2002 रोजी नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत झाले आहे.

शहराच्या तीन बाजूस खाड्या व समुद्र असल्याने भरतीवेळी शहरात लहान खाड्यातून पाणी शहरात येते. तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील डोंगर रस्त्यातून पावसाचे पाणी हे राष्ट्रीय महामार्ग ओलांडून दहिसर ते घोडबंदर मधील विविध नाल्यातून पेणकरपाडा, मिरागांव, काशीगांव, घोडबंदर भागातून घोडबंदर खाडीस वाहते. मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून वेळोवेळी शहरातील आवश्यकता व उपलब्ध निधीतून नागरी भागातून जाणारे नाले पक्क्या स्वरुपात बांधलेले आहेत.

पावसाळ्यातील पावसाचे पाणी व भरतीचे पाणी यामुळे पाण्याचा निचरा न झाल्याने शहरातील सखल भागात पावसाचे पाणी साचते.

मिरा भाईंदर शहर पुरमुक्त होण्यासाठी सर्वेक्षण करणे, नाल्यातील कांदळवन / तिवरांची झाडे काढणे, नाल्याचे खोलीकरण, रुंदीकरण करणे, फ्लॅप गेट बांधणे, नविन नाले प्रस्तावित करणे त्यासाठी कांदळवन कक्ष, वन विभाग, पर्यावरण विभाग, मा. उच्च न्यायालय यांची परवानगी घेण्याची सल्लागारामार्फत प्रक्रिया करण्यात येत आहे. तसेच शासनाकडे देखील या कामी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच महानगरपालिकेच्या अधिकारी यांची याबाबत अभ्यास करुन उपाययोजना सुचविणेसाठी समिती देखिल गठीत करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेकडून अहवाल तयार करुन मा.महासभेपुढे सादर करण्यात येईल व आय.आय.टी. मुंबई या तज्ञ संस्थेकडून सदर अहवाल तपासून घेण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती सह मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(दिपक खांबित)
**प्र. शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

PC-09/2025-26/MG-16

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.१८/ ०२/2026**

// गोषवारा //

**प्रकरण क्र. ( १६ ) :- मिरारोड (पुर्व) वॉर्ड क्र.09 येथील हजरत टिपु सुलतान चौक नाव बदलणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते, चौक, वास्तू यांचे नामकरण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' मधील प्रकरण 11(2) नुसार नामकरणाचे अंतिम अधिकार महानगरपालिकेचे / मा. महासभेचे आहेत. त्यानुसार आजपर्यंत नामकरण प्रस्ताव मंजूर करुन नामफलक लावण्यात आलेले आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेने पारीत केलेल्या नामकरण प्रस्तावात बदल करण्यात येऊ नये या करीता मा.महासभा दि.23/06/2021 ठराव क्र.23 अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे नविन नामकरण प्रस्तावाबाबत लोकप्रतिनिधी, विविध राजकीय, सामाजिक संघटना नागरीक यांचेमार्फत प्राप्त होणाऱ्या प्रस्ताबाबत अभ्यास करुन सक्षम प्राधिकरणाकडे (मा.महासभेपुढे) प्रस्तावाची शिफारस करण्याकरीता दि.15/09/2025 रोजीच्या आदेशानुसार समिती गठीत करण्यात आलेली आहे.

मा. विशेष महासभा दि.03/12/2016 ठराव क्र.97 अन्वये मिरारोड (पुर्व) वॉर्ड क्र.09 मधील उड्डाणपुल ते लोढा पार्क रस्त्यावरील चौकास हजरत टिपु सुलतान चौक असे सर्वानुमते नामकरण करण्यात आलेले आहे. सदर वस्तुस्थिती सविनय सादर करण्यात येत आहे.

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

**(दिपक खांबित)**
**प्र.शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC-09/25-26/DK/GO-14

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८ / ०२ /2026

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (१७ ) :-** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे डोंगरी, तारोडी, चौक, पाली, उत्तन व मोरवा या 06 महसुली गावांसाठीच्या क्षेत्रासाठी "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" यांनी तयार केलेल्या मंजूर विकास योजनेमधील मौजे उत्तन येथील स.क्र. 242पै. व इतर या जमिनीवरील आ.क्र.20 "कत्तलखाना" हे आरक्षण वगळणेच्या अनुषंगाने फेरबदल करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे मोरवा, डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या गावासह बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मौजे मनोरी व गोराई या अधिसूचित (गोराई-मनोरी-उत्तन अधिसुचित क्षेत्र) क्षेत्रासाठी दि.01/12/2007 पासून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून शासनाने नियुक्ती केली होती. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उक्त अधिसुचित क्षेत्रासाठी तयार केलेल्या विकास आराखडयास शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र.सिएमएस/टिपीबी-4312/प्र.क्र.23/2013/नवि-11, दि.13/5/2013 व दि.03/06/2016 अन्वये मंजूरी प्राप्त आहे.

उक्त अधिसुचित क्षेत्र हे बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट असुन संबंधित महानगरपालिका त्यांच्या मंजुर विकास योजनेप्रमाणे उक्त विकास योजनेची अंमलबजावणी करु शकणार असल्याने MMRDA ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन नियुक्ती कायम ठेवणेचे प्रयोजन राहत नसल्याने शासनाने गोराई-मनोरी-उत्तन या अधिसुचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणुन असलेली नियुक्ती क्र.टिपीबी-4316/प्र.क्र.257/2016/नवि-11 दि.16/03/2017 रोजीच्या अधिसूचनेद्वारे रद्द करुन सदर मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गावांसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेची "नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली आहे.

उक्त मंजूर विकास योजनेमध्ये मौजे उत्तन येथील स.क्र. 242पै., 282पै., 283अपै., या जमिनीवर आरक्षण क्र. 20 "कत्तलखाना" (आरक्षणाचे क्षेत्र - 3673.00 चौ.मी.) प्रस्तावित आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठीची दि.14/05/1997 ची मंजूर विकास योजना (अमलबजावणी दि.15/07/1997) सुधारीत करुन ती कलम 26(1) अन्वये दि.28/10/2022 रोजी प्रसिध्द केली असून त्यामध्ये मौजे भाईंदर येथील स.क्र.722पै., 764पै. या जागेवर आरक्षण क्र.31 "कत्तलखाना" (क्षेत्र 16800.00 चौ.मी.) प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, सदरची प्रारुप विकास योजना कलम 30 अन्वये शासनास सादर करताना त्यामध्ये फेरबदल क्र. एम-32 नुसार सदरचे प्रस्तावित आरक्षणाचे नामाभिदान "बगीचा" असे प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर प्रारुप विकास योजनेच्या अनुषंगाने मा. संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचे आरक्षण वगळणेच्या अनुषंगाने कत्तलखाना हे आरक्षण योग्य ठिकाणी प्रस्तावित करणेकामी दि.19/03/2025 रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर करणेबाबत कळविले असता महानगरपालिकेने उक्त 06 गावाच्या (MMRDA) मंजूर विकास योजनेमध्ये "कत्तलखाना" हे आरक्षण प्रस्तावित असल्याने उक्त फेरबदल मान्य करणेबाबतचा अहवाल शासनास दि.25/03/2025 रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील उक्त मौजे मोरवा, डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या गावांची प्रारुप सुधारीत विकास योजना तयार करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 मधील तरतुदीनुसार तयार करण्याच्या अनुषंगाने कलम 38 सह कलम 23(1) अन्वये ठराव क्र.460 दि.13/03/2024 नुसार इरादा घोषित केला आहे.

उक्त प्रारुप सुधारीत विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम 26(1) अन्वये नागरिकांच्या / जनतेच्या सुचना/हरकती करिता दि.24/09/2025 रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सदरच्या प्रारुप प्रसिध्द विकास योजनेमध्ये उक्त मंजूर विकास योजनेमधील उक्त कत्तलखान्याचे आरक्षणाच्या ठिकाणी आरक्षण क्र.30 “कत्तलखाना” (आरक्षणाचे क्षेत्र - 4700.00 चौ.मी.) त्याचठिकाणी कायम ठेवून प्रस्तावित केले आहे.

सदरच्या प्रारुप प्रसिध्द विकास योजनेवर नागरिकांकडून सुचना / हरकती प्राप्त झाल्या असून सदरच्या प्राप्त सुचना / हरकतदारांना सुनावणी देणेकामी नियोजन समिती गठीत करणे व तद्नंतर अधिनियमातील तरतुदीनुसार सुनावणीअंती विकास योजना शासनास कलम 30 अन्वये मंजुरीसाठी सादर करणेकामी लागणारा कालावधी विचारात घेता सद्यस्थितीत उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.20 “कत्तलखाना” हे आरक्षण वगळणेच्या अनुषंगाने फेरबदल करता येवू शकतो तसेच प्रारुप विकास योजनेवर प्राप्त सुचना / हरकतीच्या अनुषंगाने सुनावणीअंती प्रारुप विकास योजनेमधील प्रस्तावित आरक्षण वगळण्याची कार्यवाही नियमानुसार करता येवू शकते.

त्यामुळे सद्यस्थितीत उक्त मंजूर विकास योजनेतील मौजे उत्तन येथील स.क्र. 242पै. व इतर या जमिनीवरील आ.क्र.20 “कत्तलखाना” हे आरक्षण वगळणेच्या अनुषंगाने उक्त अधिनियमातील कलम 37 अन्वये फेरबदल करणेस मान्यता मिळणेसाठी मा. महासभेस शिफारस आहे.

**(मा. आयुक्त सो., यांचे मान्यतेने.)**

**(पु. म. शिंदे)**
**सहायक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.११ /०२ /२०२६ वेळ ३:१२.३०
रजिस्टर नोंद अ. क्र. १५ वर्ष २५-२६
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/ ०२ /2026

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (१८) :-** मिरा भाईंदर महानगरपालिकेने महानगरपालिका क्षेत्रामध्ये अधिसुचित केलेली नागरी पुनरुत्थान आराखडे (URP) / Cluster योजना रद्द करणेबाबत.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये भागश: मंजूर करण्यात आलेली असून ती दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. तर वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रारुप सुधारीत विकास योजना कलम 26 अन्वये दि. 27/10/2022 रोजी प्रसिद्ध होवुन ती अधिनिमाचे कलम 30 खालील तरतुदीनुसार नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक नगररचना, ठाणे शाखा, ठाणे जिल्हा यांनी दि.25/11/2023 रोजी मंजूरीसाठी शासनास सादर केलेली आहे.

शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर काही नियोजन प्राधिकरणे वगळता इतर सर्व नियोजन प्राधिकरणासाठी दि.02/12/2020 अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) लागू केली असून सदर नियमावलीतील विनियम क्र.14.8 ही तरतुद शहरी नुतनीकरण योजना (Urban Renewal Scheme) संबंधित असून सदर तरतुदी अंतर्गत इमारतीचा पुनर्विकास करता येवू शकतो. सदरच्या नियमाअंतर्गत विनियम क्र.14.8.1(ii) नुसार विकास योजना नकाशावर क्लस्टरची सुस्पष्टा केली असल्यास किंवा आयुक्त यांच्या अधिकारात अधिसूचित केली असल्यास किंवा विकास योजनेवर क्लस्टर दर्शविले नसल्यास खाजगी विकासक यांच्यामार्फत क्लस्टर योजना राबविता येवू शकते.

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील विनियम क्र.14.8.1 नुसार क्लस्टर योजनेअंतर्गत विकसन करणेकामी दाटीवाटीच्या क्षेत्राबाहेर (Non Congested Area) किमान 10000.00 चौ.मी. क्षेत्र आवश्यक आहे. तर दाटीवाटीच्या क्षेत्रामध्ये (Congested Area) किमान क्षेत्र 4000.00 चौ.मी. आवश्यक असून, विशिष्ट प्रकरणी High Power Committee (HPC) च्या मान्यतेने 8000.00 चौ. मी. क्षेत्रावर Cluster योजना राबविता येऊ शकते.

उपरोक्त UDCPR मधील तरतुदीनुसार URP / URS अधिसुचित करण्याच्या अनुषंगाने व तद्नंतर त्याची अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने URP मधील क्षेत्राचे सर्व्हेक्षण करणेच्या अनुषंगाने सल्लागार नियुक्तीकरीता निविदा मागविणेकामी प्रशासकीय ठराव क्र.13 दि.08/09/2022 मान्यता दिली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने मे. टेक्कॉम अर्बन मॅनेजमेंट कन्सल्टंट ॲण्ड सर्विस प्रोव्हाडर्स (TUMC) यांची कमी दराची निविदा विचारात घेवून त्यास प्रशासकीय ठराव क्र.179 दि.29/12/2022 अन्वये मान्यता दिली आहे. तद्नंतर प्रशासकीय ठराव क्र.286 दि.02/03/2023 अन्वये Project Implemention Unit म्हणून नियुक्ती करणेबाबत ठराव पारीत आहे.

उक्त नियमावलीमधील तरतुदी अंतर्गत विनियम क्र.14.8.1(ii)(b) अंतर्गत मा. आयुक्त यांच्या अधिकारात दि.03/05/2023 रोजीच्या अधिसुचनेव्दारे (राजपत्रात प्रसिध्दीकरण दि.08/05/2023) महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण 24 Urban Renewal Plan (URP) अधिसुचित केले असून त्यांचे एकूण क्षेत्र 451.68 हे.आर. एवढे असून सदर 24 URP पैकी प्रथम टप्प्यात 7 URP (क्षेत्र 134.22 हे.आर.) चे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने त्यापैकीच्या 06 URP चे सर्व्हेक्षण (क्षेत्र 92.00 हे.आर.) करणेकरीता शासनाकडून क्लस्टर योजना राबविणेकरीता प्राप्त झालेल्या 10 कोटी रक्कमेमधून खर्च करणेकामी प्रशासकीय ठराव क्र.82 दि.29/05/2023 अन्वये मान्यता दिली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार प्रशासकीय ठराव क्र.198 दि.08/09/2023 अन्वये प्रथम टप्प्यातील URP चे सर्व्हेक्षणासह अंमलबजावणी करणेकामी मे. टेक्कॉम अर्बन मॅनेजमेंट कन्सल्टंट ॲण्ड सर्विस प्रोव्हाडर्स (TUMC) यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देवून त्यानुसार दि.04/10/2023 रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत.

उक्त नियुक्त संस्थेमार्फत प्रथम टप्प्यातील 6 URP चे Inception Report, UAV Drone Survey, Base Map, Lidar इत्यादी कामे पूर्ण झाली असून MIS अंतर्गत URP-1 तसेच URP-13 यामधील काही आस्थापनेस अनुक्रमांक देवून त्यांचे Biometirc तसेच GPS सर्व्हेक्षण केले आहे तसेच सदर उपरोक्त दोन URP च्या भागश: क्षेत्राचे Richo Survey करण्यात आले आहे

महानगरपालिकेने घोषित केलेल्या URP मधील बहुतांश इमारती या ग्रामपंचायत कालावधीमधील अनधिकृत इमारती तर काही इमारती या अधिकृत आहेत.

सदर घोषीत केलेल्या 24 आराखडयाच्या क्षेत्रामध्ये अंतर्गत बहुतांश रस्ते हे 6.00 मी. पेक्षा कमी रुंदीचे तर काही रस्ते हे त्यापेक्षा जास्त रुंदीचे असून, Cluster मधील बहुतांश इमारती ह्या चार मजल्याच्या मर्यादेत असून सदर त्याठिकाणी कोणत्याही सार्वजनिक सुख सोयी (उदा. बगीचा, खेळाचे मैदान, आवश्यक रुंदीचे रस्ते) उपलब्ध नाहीत. Cluster अंतर्गत इमारतीचा पुनर्विकास केल्यास सदर परिसरामधील अरुंद रस्ते हे जास्त रुंदीचे प्रस्तावित करता येवू शकतील, तसेच नागरीकांना / इमारतीधारकांना बगीचा, खेळाचे मैदान, इत्यादी सुविधा उपलब्ध होवू शकतील.

महानगरपालिकेकडे प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने व तद्नंतर महानगरपालिकेने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने URS मधील पुनर्विकासासाठीच्या इमारत धारकांना स्वंतत्रपणे इमारतीचा पुनर्विकास करावयाचा झाल्यास त्यांना आवश्यक त्या रुंदीचे रस्ते तसेच सार्वजनिक सुविधा उपलब्ध होणार नसून पूर्वीच्या आहे त्याठिकाणीच स्वतंत्र पुनर्विकासाअंतर्गत (Individual Redevelopment) त्याच जागेवर पुनर्विकास झाला तरी इमारत धारकांना सुविधा उपलब्ध होऊ शकणार नाहीत याबाबी विचारात घेवून शासनाने UDCPR मधील क्लस्टर संबंधित तरतुदीमध्ये सुसुत्रता व सुलभता होवून क्लस्टरची अंमलबजावणी जलदगतीने होण्याच्या दृष्टिकोनातून दि.12/12/2025 रोजीच्या सुचनेव्दारे फेरबदल प्रस्तावित केला आहे. तसेच क्लस्टर योजनेअंतर्गत स्वतंत्र भुखंडावर पुनर्विकास परवानगी देण्याच्या अनुषंगाने देखील दि.05/12/2025 अन्वये नियमावलीमध्ये बदल करुन त्यावर नागरिकांकडून सुचना / हरकती मागविण्यात आलेल्या आहेत.

क्लस्टर योजना राबिवणे व तिची अंमलबजावणी करणे याबाबी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील उपरोक्त नमूद तरतुदीअंतर्गत करण्याचे प्रयोजन असल्याने व सदरच्या तरतुदीमध्ये घोषित केलेले URP / URS रद्द करणेची तरतुद नसल्याने तसेच URP ची

अंमलबजावणी जलद गतीने होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने URP च्या क्षेत्रामध्ये व त्याअनुषंगिक नियमामध्ये उपरोक्त नमूद केल्यानुसार फेरबदल प्रस्तावित करुन त्यावर सुचना / हरकती मागविल्या असून त्यावर शासनाकडून अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याने महानगरपालिका क्षेत्रामध्ये घोषित केलेले नागरी पुनरुत्थान आराखडे (URP) / Cluster योजना रद्द करणे संयुक्तिक होणार नाही.

उपरोक्त प्रकरणाच्या अनुषंगाने वरील वस्तुस्थिती सदर प्रकरणात मा. महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

**(मा. आयुक्त सो., यांचे मान्यतेने.)**

**(पु. म. शिंदे)**
**सहायक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८ / ०२/2026

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (१९) :-** शासनाने एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील (UDCPR) पुनर्विकास योजना (Re-development) व नागरी पुनरुत्थान योजना (Cluster) संबंधित विनियमामध्ये अनुक्रमे दि.05/12/2025 व दि.12/12/2025 अन्वये फेरबदल प्रस्तावीत केले असून त्यावर महानगरपालिकेकडून सूचना / हरकती नोंदविणे.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12 दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रारुप सुधारीत विकास योजना कलम 26 अन्वये दि. 27/10/2022 रोजी प्रसिद्ध होवुन ती अधिनिमाचे कलम 30 खालील तरतुदीनुसार नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक नगररचना, ठाणे शाखा, ठाणे जिल्हा यांनी दि.25/11/2023 रोजी मंजूरीसाठी शासनास सादर केलेली आहे.

शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर काही नियोजन प्राधिकरणे वगळता इतर सर्व नियोजन प्राधिकरणासाठी दि.02/12/2020 अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) लागू केली असून, उक्त नियमावलीमधील विनियम क्र.7.6 पुर्न:विकास योजनेनुसार (Re-development) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या धोकादायक इमारतींचा पुनर्विकास करणेबाबत येणाऱ्या अडचणीबाबत तसेच विनियम क्र.14.8 नागरी पुनरुत्थान योजनेमधील (Cluster) स्वतंत्र इमारतीकरीता परवानगी देण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडे प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने तसेच शासनाकडे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने महानगरपालिकेने दि.24/06/2025 रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला होता.

उपरोक्त महानगरपालिकेकडील अहवाल तसेच शासनाकडे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने शासनाने एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रा सबंधितच्या विशेष तरतुदी अंतर्गत (विनियम क्र.10.7 अंतर्गत) विनियम क्र.10.7.3 नव्याने अंतर्भूत करुन त्यामध्ये विनियम क्र.14.8.1 नुसार अधिसुचित केलेल्या नागरी पुनरुत्थान आराखडयामधील (URP) धोकादायक इमारतीचे जमिनमालक / इमारतधारक हे क्लस्टर योजना अंतर्गत विकसन करणेकामी इच्छूक नसल्यास त्याबाबीसह तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्राकरीता लागू असलेल्या नियमाच्या धर्तीवर नियम लागू करण्याच्या अनुषंगाने त्याबाबतच्या तरतूदीचा समावेश करुन त्याबाबतची सूचना कलम 37(1कक) अन्वये नागरिकांच्या सुचना / हरकतीसाठी दि.05/12/2025 रोजीच्या सुचनेव्दारे सदरच्या तरतुदी प्रसिध्द केल्या असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Regulation | Existing Provision | Proposed Modification |
|---|---|---|---|
| 1. | **Newly inserted Clause 10.7.3. in Regulation 10.7** | --- | **10.7.3 Independent redevelopment of certain plots/ buildings included in Urban Renewal Plan(URP) :-** If the land owner/building tenements in the notified URP [well- defined in Reg. 14.8.1] are not interested in redevelopment under the cluster scheme under Reg. 14.8 and are willing to redevelop their building independently, and if redevelopment of such buildings independently without granting concession is possible, then redevelopment of such buildings on such independent plots, may be allowed independently wherein FSI & other benefits as per Reg.14.8. applicable for URP shall not be applicable but the FSI as per Table No. 6G of UDCPR Reg.6.3 will be applicable. However in such independent redevelopment proposal, no Compound wall can be constructed on the said independent plots. |
| 2. | **Newly inserted Clause 10.7.4. in Regulation 10.7** | --- | **10.7.4 Podium -** The Regulation 10.2.12 shall be applicable to area within Mira Bhayandar Municipal Corporation. |
| 3. | **Newly inserted Clause 10.7.5. in Regulation 10.7** | --- | **10.7.4** Provisions of regulation 10.2.15 shall be Applicable to area within Mira Bhayandar Municipal Corporation. |
| 4. | **Newly inserted provision in City Specification Regulation of VVMC, UMC, NMMC, PMC i.e. Regulation 10.6, 10.8, 10.14, 10.14(A) & 10.16** | --- | Provision of Regulation 10.2.12 & 10.2.15 shall be applicable to area within municipal corporation in MMR region. |

तसेच एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील विनियम क्र.14.8 नुसार अधिसूचित केलेल्या नागरी पुनरुत्थान आराखडयाच्या तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित करुन दि.12/12/2025 रोजी शासनाने सुचना प्रसिध्द केली आहे.

| Sr.No. | Regulation | Existing Provision | Proposed Modification |
|---|---|---|---|
| 1. | **Newly inserted Clause 10.7.6 in Regulation 10.7** | --- | **10.7.6 Redevelopment of Group of Dangerous building included in Urban Renewal Plan (URP) of Mira-Bhayandar Municipal Corporation under Regulation 14.8 may be permitted with prior approval of Government within Permissible FSI given below subject to fulfilment of Following criteria:-**<br>i. Minimum area of the land under redevelopment under this regulation included in the URP shall |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | be 2500 sq.m. and include at least 5 dilapidated/dangerous buildings, declared so duly.<br>ii. The land under such proposal must have a minimum 18 m. wide road access.<br>iii. The development in such part of URP shall be planned in such way that, the planned development of the remaining area in the URP does not get affected.<br>iv. There shall be deemed consent of owner & occupiers of this part of URP for the purposes of redevelopment of remaining portion of URP as per UDCPR.<br>v. All other provisions/conditions of Regulation 14.8 shall remain applicable and compliance of the same shall be mandatory.<br>**vi. Permissible FSI :-**<br>The Permissible FSI shall be FSI required for rehab of existing occupiers / tenants +0.50 incentive FSI or 4.00 whichever is higher. |

उक्त नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1कक) अन्वये प्रस्तावीत करण्यात आलेल्या फेरबदलावर 30 दिवसांच्या आत जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी उक्त दिनांकान्वये सूचना प्रसिद्ध करण्यात आली असून सदरच्या प्रसिध्दीकरणावर सुचना / हरकती ह्या मा. सहसंचालक नगररचना, कोकण विभाग यांच्याकडे नोंदविणे आवश्यक असून दरम्यानच्या कालावधीमध्ये महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने त्यादरम्यान नियोजन प्राधिकरणाकडून सुचना / हरकती घेण्यात आलेल्या नाहीत.

उपरोक्त प्रसिध्दीकरणाच्या अनुषंगाने मा. महासभेच्या निर्णयाअंती त्यावर सुचना / हरकती नोंदविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

उपरोक्त प्रकरणाच्या अनुषंगाने वरील वस्तुस्थिती सदर प्रकरणात मा. महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

**(मा. आयुक्त सो., यांचे मान्यतेने.)**

**(पु. म. शिंदे)**
**सहायक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 9८/02/2026

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (20) :-** मिरा भाईंदर शहराची सन 1997 अन्वयेची मंजूर विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील तरतूदीनुसार कलम 26(1) अन्वये प्रसिद्ध करुन ती कलम 30 अन्वये नियुक्त अधिकारी यांनी शासनास मंजुरीसाठी सादर केली असून सदर शासनास सादर केलेली प्रारुप विकास योजना रद्द करणे तसेच मौजे डोंगरी, तारोडी, चौक, पाली, उत्तन व मोरवा या 06 महसुली गावांची प्रारुप विकास योजना कलम 26(1) अन्वये दि.24/09/2025 रोजी प्रसिद्ध केली असून सदर विकास योजना रद्द करुन सदरच्या दोन्ही विकास योजना एकत्रितपणे नव्याने तयार करणे.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये भागश: मंजूर करण्यात आलेली असून ती दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. तर वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मिरा-भाईंदर शहराची मंजूर विकास योजना सुधारित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 23 (1) व कलम 38 अन्वये महासभा ठराव क्र. 76, दि.15/10/2015 अन्वये इरादा जाहीर करुन त्याबाबतची सुचना शासन राजपत्रात दि.26/11/2015 रोजी प्रसिध्द करुन सदर सुधारीत प्रारुप विकास योजना तयार करणेकामी दि.10/03/2016 रोजीच्या आदेशान्वये तत्कालीन नगररचनाकार (मिरा भाईंदर महानगरपालिका) यांची "नगररचना अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. सदरची प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार आचारसंहितेचा कालावधी धरून दि.09/01/2018 पर्यंत कलम 26(1) अन्वये प्रसिध्द करणे आवश्यक होते. तथापि, सदरची प्रारुप विकास योजना विहीत मुदतीत प्रसिध्द करणेकामी नियोजन प्राधिकरण असमर्थ ठरले असल्याने उक्त अधिनियमातील कलम 21(4)(अ) नुसार मा. सहसंचालक नगररचना, कोकण विभाग यांनी उक्त अधिनियमाचे कलम 26 ते कलम 30 अन्वयेचे सर्व कार्य पार पाडणेकामी सहायक संचालक नगररचना, ठाणे शाखा कार्यालय, ठाणे यांची **"नियुक्त अधिकारी"** म्हणून दि.25/09/2018 रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती केली होती.

सदर प्रारुप विकास योजना नियुक्त अधिकारी यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 26 (1) नुसार प्रसिद्ध करण्यासाठी मा. संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी मंजुर केलेल्या मुदतवाढीनुसार मिरा भाईंदर शहराची प्रारुप सुधारीत विकास योजना उक्त नियुक्त अधिकारी यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम

26(1) नुसार दि.28/10/2022 रोजी शासन राजपत्रात नागरिकांच्या सुचना / हरकतीकरीता प्रसिद्ध करण्यात आली होती.

उक्त प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेवर प्राप्त झालेल्या हरकत / सुचनांच्या अनुषंगाने हरकतदारांना सुनावणी देवुन अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 28 (2) अन्वये नियोजन समिती (शासकीय / तज्ञ सदस्यांची) नियुक्ती करणेकामी मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.30/11/2022 रोजीच्या आदेशान्वये दिलेल्या मान्यतेनुसार नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, ठाणे यांनी आदेश क्र. मिभावि/प्रासुवियो-मिरा भाईंदर / कलम 28 (2) नियोजन समिती/3021, दि.23/12/2022 अन्वये गठन करुन प्राप्त सुचना / हरकतदारांना नियोजन समितीने सुनावणी देवुन सदर सुनावणीच्या अनुषंगाने त्यांचा अहवाल दि.18/10/2023 रोजी नियुक्त अधिकारी यांच्याकडे सादर केला आहे.

नियुक्त अधिकारी यांनी नियोजन समितीचा अहवाल मान्य करुन प्रारुप विकास योजनेच्या मसुदयात केलेले फेरबदलाची सुची अधिनियमाचे कलम 28(4) नुसार दि.23/10/2023 रोजी शासन राजपत्र व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे नियुक्त अधिकारी यांनी मिरा भाईंदर शहराची प्रारुप सुधारीत विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम 30(1) अन्वये आवश्यक ती वैधानिक कार्यवाहीअंती शासनास दि.25/10/2023 रोजीच्या पत्रान्वये मंजुरीकरिता सादर केलेली आहे. सदरची प्रारुप विकास योजना शासन स्तरावर मंजुरीकरीता प्रलंबित आहे.

उक्त दि.14/05/1997 रोजीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, मोरवा आणि डोंगरी या गावांसह बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मौजे गोराई व मनोरी या गावांचे क्षेत्र "मनोरंजन व पर्यटन विकास क्षेत्र" म्हणून विकसित करण्याची आवश्यकता लक्षात घेवून, शासनाने मुंबई महानगर प्रदेशाचा प्रादेशिक आराखडा मंजूर करताना सदर क्षेत्रास "मनोरंजन व पर्यटन विकास क्षेत्र" म्हणून अधिसूचित करुन शासनाच्या दि.24/08/2004 रोजीच्या अधिसूचनेन्वये सदर क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

तदनंतर, शासनाने पर्यटन धोरण-2006 जाहीर केल्यानंतर, नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक 09/04/2007 रोजीच्या अधिसूचने अन्वये सदर क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांची नियुक्ती रद्द करुन सदर क्षेत्राकरीता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) यांची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. परंतु, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) यांचेकडे तांत्रिक कर्मचाऱ्यांचा अभाव आणि इतर कारणांमुळे तसेच उक्त अधिनियम, 1966 मधील विशेष नियोजन प्राधिकरणाची कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक तांत्रिक व अन्य मनुष्यबळ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे उपलब्ध असल्याची बाब विचारात घेऊन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा या 06 गावासह बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मौजे गोराई व मनोरी या 02 गावासाठी (गोराई-मनोरी-उत्तन अधिसुचित क्षेत्र) "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" हे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.01/12/2007 रोजीच्या अधिसुचनेव्दारे नियुक्ती करण्यात आली होती.

उक्त अधिसुचित एकत्रित क्षेत्राची (गोराई-मनोरी-उत्तन अधिसुचित क्षेत्र) विकास योजना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी तयार करुन ती शासनास मंजुरीसाठी सादर केली असता शासनाने उक्त विकास योजना कलम 31(1) अन्वये अनुक्रमे दि.13/05/2013 व दि.03/06/2016 च्या अधिसुचनेव्दारे मंजुर केलेली आहे.

उक्त अधिसुचित क्षेत्र हे मिरा भाईंदर महानगरपालिका व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट असुन संबंधित महानगरपालिका त्यांच्या मंजुर विकास योजनेप्रमाणे उक्त विकास योजनेची अंमलबजावणी करु शकणार असल्याने MMRDA ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन नियुक्ती कायम ठेवणेचे प्रयोजन राहत नसल्याने शासनाने गोराई-मनोरी-उत्तन या अधिसुचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणुन असलेली नियुक्ती ही दि.16/03/2017 रोजीच्या अधिसूचनेद्वारे रद्द करून सदर मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा या 06 गावांसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेची "नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली आहे.

उक्त अधिनियमामधील कलम 38 अन्वये, 20 वर्षातुन किमान एकदा विकास योजना सुधारीत करणे आवश्यक असल्याने तसेच शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.टिपीएस-1818/1489/प्र.क्र.303/18/नवि-13 दि.25/01/2019 व त्यानंतरचे दि.17/06/2019 रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या क्षेत्रातील विकास योजना सुधारीत करताना भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) संगणक प्रणालीचा वापर करुन (GIS Platform वर) तयार करणेकामी अधिनियमातील कलम 154(1) अन्वये प्राप्त अधिकारात राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा या 06 गावांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम अधिनियम 1966 चे कलम 38 सह कलम 23(1) अन्वये विकास योजना सुधारीत करणेबाबतचा इरादा सर्वसाधारण सभा (प्रशासकीय ठराव) क्र.460 दि.13/03/2024 अन्वये जाहीर करुन त्याबाबतची सुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.13/03/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदरची प्रारुप विकास योजना तयार करणेकामी उक्त अधिनियामचे कलम 24 अन्वये दि.25/04/2024 रोजीच्या आदेशान्वये सहायक संचालक, नगररचना, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची नगररचना अधिकारी" म्हणून नेमणूक केली आहे

सदरच्या प्रारुप सुधारीत विकास योजनेचा अस्तित्वातील जमिन वापर नकाशा (ELU) दि.07/10/2024 अन्वये अहवालासह मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे हस्तांतरीत केला असून तद्नंतर उक्त अधिनियमाचे कलम 26(1) अन्वये प्रारुप विकास योजना दि. दि.10/09/2025 अन्वये अहवालासह मिरा भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन ती जनतेकडून/नागरिकांकडून विहित मुदतीमध्ये (30 दिवस) सुचना/हरकती मागविणेकरीता दि.24/09/2025 रोजी शासन राजपत्रात तसेच स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

उक्त अधिनियमाचे कलम 26(1) अन्वये प्रसिद्ध केलेल्या प्रारुप विकास योजनेवर प्राप्त झालेल्या हरकती / सुचना धारकांना सुनावणी देऊन त्याबाबतचा अहवाल मिरा भाईंदर महानगरपालिकेस सादर करणेकरीता उक्त अधिनियमाचे कलम 28(4) अन्वये नगररचना विभागाशी तसेच पर्यावरण विभागाशी संबंधित तज्ञ व्यक्तींची (कमाल 04) तसेच महानगरपालिकेच्या स्थायी समितीमधील 03

सदस्यांची मा. संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेने नियोजन समिती गठीत करणेची पुढील कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 21 ते कलम 30 मधील तरतुदीनुसार प्रारुप सुधारीत विकास योजना रद्द करणे बाबत कोणतीही तरतुद नाही. उक्त अधिनियमाचे कलम 30(1) अन्वये सुधारीत प्रारुप विकास योजना नियोजन प्राधिकरणाने / नियुक्त अधिकारी यांनी मंजूरीसाठी शासनास सादर केल्यानंतर उक्त अधिनियमाचे कलम 31(1) अन्वये सदरची विकास योजना मंजूर करणेबाबत किंवा परत करणेबाबत किंवा रद्द करणेबाबतचे अधिकार शासनास आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील 13 गावांची (मौजे खारी, गोडदेव, घोडबंदर, पेणकरपाडा, मिरा, काशी, नवघर, भाईंदर, महाजनवाडी, चेणे, वरसावे, राई-मुर्धे, मुर्धे) प्रारुप सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 मधील तरतूदीनुसार विविध टप्प्यांवर विहीत मुदतीत वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन उक्त अधिनियमातील कलम 30 अन्वये शासनास मंजुरीस्तव सादर करण्यात आलेली असून, मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा या 06 गावांच्या क्षेत्राची प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम 26 अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेली असल्याने नियोजन प्राधिकरण म्हणून सदरची विकास योजना विहित मुदतीमध्ये मंजुरीसाठी शासनास उक्त अधिनियमाचे कलम 30 अन्वये सादर करणे बंधनकारक असून सदरची कार्यवाही करणेकामी नियोजन प्राधिकरण हे असमर्थ ठरल्यास उक्त अधिनियमाचे कलम 21(4) मधील तरतुदीनुसार नियोजन प्राधिकरणाचे अधिकार हे नियुक्त अधिकारी यांच्याकडे जावू शकतात.

सबब महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 21 ते कलम 30 मधील तरतुदीनुसार शासनास कलम 30 अन्वये मंजुरीसाठी सादर केलेली (13 गावांची) प्रारुप विकास योजना रद्द करता येत नसल्याने तसेच उक्त अधिनिमयाचे कलम 26(1) अन्वये प्रसिध्द केलेली 06 गावांची प्रारुप विकास योजना वैधानिक कार्यवाही करुन उक्त अधिनियमाचे कलम 30 अन्वये शासनास सादर करणे बंधनकारक असल्यामुळे सदरच्या दोन्ही विकास योजना रद्द करण्याचे व त्याचे एकत्रितीकरण करुन पुनश्च: नव्याने विकास योजना सुधारीत करण्याचे प्रयोजन राहत नाही.

उपरोक्त प्रकरणाच्या अनुषंगाने वरील वस्तुस्थिती सदर प्रकरणात मा. महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

**(मा. आयुक्त सो., यांचे मान्यतेने.)**

**(पु. म. शिंदे)**
**सहायक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. ११/०२/२०२६ वे. ३.१२.३०
रजिस्टर नोंद अ.क्र. १२ सन २५-२६
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**

**भाईंदर (प.) ता.जि.ठाणे**

## समाजविकास विभाग

## मा. महासभा दि.१८/ ०२ /2026

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र.२१ :- मिरा भाईंदर महानगरपालिका वर्धापन दिन दि.28/02/2026 पासून रौप्य् महोत्सवी वर्ष म्हणून दि.28/02/2026 ते दि.27/02/2027 या कालावधीत विविध उपक्रम/समारंभ आयोजित करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दि.28 फेब्रुवारी 2002 रोजी झालेली असुन दि.28 फेब्रुवारी 2026 ते दि.28 फेब्रुवारी 2027 या कालावधी रौप्य् महोत्सवी वर्ष म्हणुन साजरा करावयाचा मानस आहे. त्या निमित्ताचे औचित्य् साधुन दि.28 फेब्रुवारी 2026 ते दि.28 फेब्रुवारी 2027 या कालावधीमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे.

दि.28 फेब्रुवारी 2026 रोजी महानगरपालिका 25 व्या रौप्य् महोत्सवी वर्षात पर्दापण करणार असुन सदर दिवशी कार्यक्रमाची सुरुवात म्हणुन ग्रामपंचायत ते महानगरपालिकेची पर्यंतची वाटचाल व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे.

सदर कार्यक्रमाकरीता सन 2025-26 या आर्थिक वर्षात समाजविकास विभाग अंतर्गत "महानगरपालिका वर्धापन दिन" या लेखाशिर्षाखाली रु.20.00 लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. सदरबाबत ऑनलाईन बजेट ऐंटी सोबत जोडुन देत आहे. सदर तरतुदीमधुन दि.28 फेब्रुवारी 2026 रोजी वर्धापन निमित्त् कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे.

सन 2026-27 हे पुर्ण आर्थिक वर्ष रौप्य् महोत्सवी वर्ष म्हणुन साजरा करावयाचा असुन त्यानिमित्तीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे. सदर कार्यक्रमाचे आयोजन करणेकामी रु.5.00 कोटी एवढी तरतुद आवश्यक् आहे.

तरी सन 2026-27 या आर्थिक वर्षात समाजविकास विभागा अंतर्गत "महानगरपालिका वर्धापन दिन" या लेखाशिर्षाखाली रु.5.00 कोटीची तरतुद करण्यास मान्यता मिळणेस शिफारस आहे.

**(कविता बोरकर)**
**उप-आयुक्त (समाजविकास)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त सो. यांच्या मंजुरीने**